रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ४९ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५

किंमत ४ ₹

## थायलंड-कंबोडियामध्ये युद्ध सुरू

**बँकॉक :** थायलंड आणि कंबोडियाच्या सीमेवर युद्धाला सुरुवात झाली आहे. रॉयल थाई आर्मीने कंबोडियाने वादग्रस्त सीमेच्या ईशान्येकडील भागाजवळील लष्करी तळांवर हवाई हल्ले केले आहेत. त्याला प्रत्यूत्तर म्हणून कंबोडियाने एअर डिफेन्स सिस्टीम सुरु केली आहे. यात दोन विमाने पाडली गेल्याचे सांगितले जाते. ऑपरेशन सिंदूरनंतर आशियात सुरु झालेले हे दुसरे युद्ध आहे. थायलंडने गुरुवारी (दि.२४) कंबोडियाच्या सीमेवर -१६ लढाऊ विमाने तैनात केली होती. मिसाईल हल्ले आणि हवाई हल्ले केले जात आहेत.



## रशियन विमानाचा लँडिंगदरम्यान अपघात

### सर्व ५० प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती

| चीन | वृत्तसंस्था |

चीनच्या सीमेलगत असलेल्या रशियाच्या पूर्वेकडील भागात ५० प्रवाशांना घेऊन जाणारे एक प्रवासी विमान कोसळले असून, सर्व प्रवासी मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची माहिती रॉयटर्स वृत्तसंस्थेने दिली आहे. हे विमान सोव्हिएत काळातील होते आणि जवळजवळ ५० वर्षे जुने होते. त्याच्या टेल क्रमांकावरून ते १९७६ मध्ये बांधले गेले असल्याचे दिसून येते.

उड्डाणाच्या दरम्यानच विमान वाहतूक नियंत्रण कक्षाचा विमानाशी संपर्क तुटला आणि काही वेळातच बचाव पथकांना घटनास्थळी विमानाच्या जळालेल्या अवशेषांचे काही भाग आढळून आले. स्थानिक आपत्कालीन सेवा मंत्रालयाच्या माहितीनुसार, अंगारा एअरलाइन्सचे-२४ हे विमान अमूर प्रदेशातील टिंडा शहराजवळ पोहोचत असतानाच रडारवरून बेपत्ता झाले. प्राथमिक विश्लेषणावरून असे दिसून येते की, कमी दृश्यमानतेमुळे लँडिंग करताना पायलटची चूक झाल्यामुळे हा विमान अपघात झाला असण्याची शक्यता आहे.

या वृत्तसंस्थेनुसार, अंगारा एअरलाइन्सचे विमान चीनच्या सीमेवरील अमूर प्रदेशातील टिंडा शहराकडे जात होते. परंतु ते रडार स्क्रीनवरून बेपत्ता झाले. रशियन वृत्तसंस्था इंटरफॅक्सनुसार, टिंडा विमानतळावर विमान उतरवण्याचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, वैमानिकाने दुसऱ्यांदा प्रयत्न केला परंतु या दरम्यान एटीसीचा विमानाशी संपर्क तुटला.

पान २ वर

## वेधक

### अनिल अंबानी यांना इडीचा दणका

**नवी दिल्ली :** उद्योगपती अनिल अंबानी आणि त्यांच्या रिलायन्स ग्रुपशी संबंधित प्रकरणात प्रवर्तन निर्देशालयाने गुरुवारी (दि.२४) सकाळी एक सर्च ऑपरेशन सुरु केलं. राजधानी दिल्ली, मुंबईसह एकाचवेळी ३५ पेक्षा जास्त लोकेशन्सवर छापेमारीची कारवाई करण्यात आली. ही कारवाई प्रिवेंशन ऑफ मनी लॉन्ड्रिंग ॲक्ट अंतर्गत होत आहे. या कारवाईत अंबानी यांच्याशी संबंधित ५० कंपन्या आणि २५ पेक्षा जास्त व्यक्तींचा शोध सुरु आहे. या ऑपरेशनमध्ये सीबीआय, नॅशनल हाऊसिंग बँक, नॅशनल फायनेंशियल रिपोर्टिंग अथॉरिटी आणि बँक ऑफ बडोदा यांच्याकडून माहिती मिळाली आहे.

### बँकांकडून १२ लाख कोटींचे कर्ज बुडीत

**नवी दिल्ली :** सरकारी बँकांनी आर्थिक वर्ष २०१५-१६ पासून २०२४-२५ पर्यंत गेल्या १० वर्षांत तब्बल १२.०८ लाख कोटीचे कर्ज राइट ऑफ केले आहे. आता बँकांना ही रक्कम परत मिळण्याची शक्यता अतिशय कमी आहे. याचदरम्यान १२ पैकी १० सरकारी बँकांच्या राइट ऑफमध्ये घट झाली. स्टेट बँक ऑफ इंडिया आणि कॅनरा बँकेत या कर्जात विशेषत: २०२५ मध्ये वाढ झाली असल्याची माहिती अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत दिली. चौधरी यांनी स्पष्ट केले की, २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत एकूण राइट ऑफची रक्कम ५.८२ लाख कोटींच्या वर गेली आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत १६२९ जणांनी १.६२ लाख कोटींचे कर्ज थकवले आहे.

## महाड एमआयडीसी पोलिसांची अमली पदार्थ विरोधी कारवाई

# ८८.९२ कोटींचे केटामाईन जप्त

### औद्योगिक वसाहतीत काही कंपन्या संशयाच्या भोवऱ्यात

जुनेद तांबोळी

| महाड |

महाड औद्योगिक वसाहत ठाण्याचे पोलीस व अंमली पदार्थ नियंत्रण विभाग यांच्या संयुक्त कारवाईतून सुमारे ८८.९२ कोटी किंमतीचा केटामाईन अमली पदार्थ जप्त करण्याची कारवाई झाली असली तरी अजूनही काही कंपन्या संशयाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता औद्योगिक वसाहतीमधील कामगारांमध्ये चर्चिली जात आहे.

महाड औद्योगिक वसाहतीत पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून, महाड एमआयडीसीतील प्लॉट नंबर २६/३ या प्लॉटमध्ये रोहन केमिकल कंपनी कार्यरत आहे. या



कंपनीच्या प्रांगणात सुरू असलेल्या बेकायदेशीर रसायन प्रक्रियेवर कारवाई करण्यात आली. या ठिकाणाहून ३४ किलो केटामाईन पावडर आणि १३ किलो लिक्विड केटामाईन असा एकूण ८८.९२ कोटींचा साठा जप्त करण्यात आला.

या युनिटचा वापर कायदेशीर उत्पादनाऐवजी अमली पदार्थ निर्मितीसाठी केला जात असल्याचे प्राथमिक तपासातून उघड झाले आहे. या बेकायदेशीर

पान २ वर

#### शरीरावर होणारे परिणाम

या औषधांच्या मिश्रणाचे सेवन केल्यानंतर, शरीरावर गंभीर परिणाम होतात. ज्यामध्ये गंभीर भ्रम, तंद्री, आत्मजागरूकता कमी होणे, समन्वय कमी होणे, ओठ निळे होणे आणि नाकातून रक्त येणे यांचा समावेश आहे. जास्त प्रमाणात घेतल्यास, श्वसनक्रिया बंद पडणे हे प्राणघातक परिणाम होऊ शकतात. पहिल्या वापरातही अचानक मृत्यू होऊ शकतो. अल्कोहोलयुक्त पेयांसह ते सेवन केल्यास मृत्यूचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. वापरकर्त्यांसाठी पूर्णपणे सामान्य जीवन पुन्हा सुरू करणे खूप कठीण होते.

## सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे समुद्रातच विसर्जन

### पीओपी मूर्तींबाबत उच्च न्यायालयाचे आदेश

| मुंबई | प्रतिनिधी |

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार करण्यात आलेल्या मुर्तींबाबत उच्च न्यायालयाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. पाच फुटांवरील गणेशमूर्तींच्या विसर्जनाला तूर्त तरी नैसर्गिक जलस्रोतांशिवाय पर्याय नसल्याच्या भूमिकेचा राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेने गुरुवारी पुनरूच्चार केल्यानंतर न्यायालयाने त्याबाबत पुन्हा एकदा असमाधान व्यक्त केले. तसेच, पाच फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींना कृत्रिम तलावाची अट बंधनकारक करणाऱ्या सरकारच्या निर्णयात बदल करून ही अट सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींना लागू असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

तथापि, सरकारने मोठ्या मूर्तींच्या कृत्रिम तलावातील



विसर्जनाबाबत सांगितलेल्या अडचणी विचारात घेऊन न्यायालयाने या मूर्तींचे समुद्रासह अन्य नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जन करण्यास परवानगी दिली. परंतु, हे आदेश केवळ माघी गणपतीपर्यंतच लागू असतील, असेही बजावले.

विशेष म्हणजे, गेल्या वर्षांपर्यंत स्वेच्छेने पीओपी मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन केले जात होते. तथापि, यंदापासून सहा फुटांच्या मूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे, या अटीची सरकार आणि सगळ्या पालिकांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे न्यायालयाने बजावले आहे.

सात हजारांहून अधिक पाच फुटांपेक्षा अधिक उंचीच्या पीओपी गणेशमूर्तींचे समुद्रात विसर्जन करणे आम्हाला योग्य वाटत नाही. आम्हाला पर्यावरणाचे कमीत कमी नुकनास हवे आहे. त्यामुळे, कृत्रिम तलावात केवळ पाच फुटांपर्यंतच्याच मूर्तींचे विसर्जन करण्याची अट सात ते आठ फुटांच्या मूर्तींपर्यंत वाढवण्यात यावी, अशी सूचना न्यायालयाने सुनावणीच्या वेळी सरकार आणि महापालिकेला केली होती. तसेच, त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते.

पान २ वर

## 'गेल'मध्ये डिझेल, पेट्रोलची तस्करी?

### कंपनीतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रमोद जाधव

| अलिबाग |

अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल कंपनीत पॉलिमार प्रकल्पाचे काम सुरू आहे. कामासाठी लागणारे माल मोठ मोठ्या वाहनांद्वारे कंपनीत आणले जात आहे. मात्र चालकाला हाताशी धरून काही मंडळी या मोठ्या वाहनामधून पेट्रोल, डिझेल तस्करी केली जात आहे. सुरक्षा रक्षकांना चकवा देत १५ ते २० लीटरच्या ट्रममध्ये भरून तो साठा अन्य वाहनांद्वारे बाहेर काढला जात आहे. या प्रकारामुळे कंपनीतील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

भारत सरकारच्या पेट्रोलिअम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली गेल कंपनी काम करीत आहे. उसर येथे गेल कंपनी असून या कंपनीच्या दुसऱ्या टप्प्यातील पॉलिमार प्रकल्पाचे काम गेल्या चार वर्षापासून सुरु आहे. प्लास्टीकचे उत्पादन करणारा देशातील सर्वात मोठा हा प्रकल्प असणार आहे. ११ हजार २५६ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाचे काम २०२१ पासून सुरू झाले.आतापर्यंत ७० टक्केपेक्षा या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. २०२६ पर्यंत प्रकल्पाचे पूर्ण करण्यासाठी युध्दपातळीवर काम सुरू आहे. या प्रकल्पाच्या कामांसाठी स्थानिकांसह वेगवेगळ्या राज्यातून कामगार दाखल झाले आहेत. अंदाजे तीन हजारहून अधिक कामगार या कंपनीत काम करीत आहेत. राष्ट्रीय दृष्ट्या अत्यंत महत्वाचा हा प्रकल्प आहे. प्रथमच तंत्रज्ञानाचा वापर करणारा हा देशातील पहिला प्रकल्प असणार आहे. त्यामुळे या प्रकल्पाकडे एक वेगळ्या नजरेने पाहिले जात आहे. प्रकल्पाचे काम चांगल्या पध्दतीने व्हावे, काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कंपनीच्या परिसरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. पोलीस दलाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्य औद्योगिक सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांमार्फत कंपनीतील सुरक्षा राखण्याचे काम केले जात आहे. कंपनीत येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांबरोबरच कामगारांचीदेखील तपासणी सुरक्षा रक्षकांच्या मार्फत केली जात आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्वाचा मानला जात आहे. मात्र तरीदेखील या कंपनीत सुरक्षा रक्षकांना चकवा देत डिझेल, व पेट्रोलची तस्करी होत असल्याची चर्चा आहे. मोठ मोठ्या वाहनांमधून १५ ते २० लीटर पेट्रोल, डिझेल काढून एका ड्रममध्ये भरले जातात. तो भरलेला ड्रम एका रिकाम्या ट्रक, जेसीबी, पोकलन,हायवाद्वारे बाहेर आणून पेट्रोल, डिझेल विकला जात आहे.

जिल्ह्यातील मांडवा, रेवदंडा समुद्रकिनारी डिझेल तस्करीच्या घटना घडत असताना कंपनीमध्येदेखील डिझेल, पेट्रोलची चोरी होण्याच्या घडत आहेत. कडक पहारा असताना कंपनीतून डिझेल, पेट्रोलची चोरीच्या घटना घडत असल्याने सुरक्षेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. यापुर्वी कंपनीतील काही साहित्यांचीदेखील चोरी झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे कंपनी व्यवस्थापन याकडे गांभीर्याने लक्ष देईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

#### अवैध दारु विक्री जोरात

गेल कंपनीमध्ये वेगवेगळ्या भागातून कामगार कामासाठी आले आहेत. दिवसभर काम केल्यावर काही कामगार मद्यपान करण्यावर भर देतात. त्यामुळे उसर परिसरात ठिकठिकाणी अवैध दारु विक्रीचा व्यवसाय छुप्या पध्दतीने सुरू आहे. रेवदंडा पोलिसांना माहित असताना ही त्यांच्याकडून कारवाई केली जात नाही. या अवैध दारु विक्रेत्यांना पोलिसांकडून अर्थपूर्ण सहकार्य मिळत असल्याची चर्चा जोरात आहे. चढत्या दराने देशी, विदेशी दारुच्या बाटल्या विकल्या जात आहेत.

> गैरप्रकार, चोरी व अनुचित प्रकारावर लक्ष ठेवण्यासाठी कंपनीत स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात आली आहे. येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांची व कामगारांची तपासणी केली जाते. तरीदेखील कंपनीतील मोठ्या वाहनांमधून पेट्रोल, डिझेलची चोरी होण्याचा प्रकार चुकीचा आहे. त्यामुळे सुरक्षा अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केल जाईल.
>
> – जितेन सक्सेना, महाव्यवस्थापक, मानव संसाधन, गेल कंपनी




## पेण येथील १६ वर्षांच्या मुलीचा बालविवाह

| पेण | वार्ताहर |

पेण येथील १६ वर्षांच्या मुलीचा बालविवाह पालकांनी लावून दिल्यानंतर तिला सासरी पनवेल तालुक्यातील पोयंजेवाडी गावात पाठविण्यात आले. सात ते आठ महिन्यांची गरोदर मुलगी गरोदरपणासाठी पेण येथील आईवडीलांच्या घरी आली. पेण येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांना या मुलीच्या वयाविषयी संशय आल्याने त्यांनी मुलीच्या आधारकार्डावरून वयाची चौकशी केल्यानतंर बालविवाहाच्या प्रकरणाला वाचा फुटली. अखेर या प्रकरणी मुलीच्या पतीवर अत्याचार केल्याचा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात बुधवारी नोंदविण्यात आला.

गेल्या वर्षी १५ जुलै ते २३ नोव्हेंबर या दरम्यान पेण येथील पीडितेचा विवाह पनवेल तालुक्यातील पोयंजे वाडीत तरुणासोबत करुन देण्यात आला. या मुलीचे वय कमी असल्याचे माहिती असूनही तीच्यासोबत त्याने शरीरसंबंध ठेवले. मात्र ती गरोदर राहिल्यावर प्रथेप्रमाणे तिला माहेरी पेण येथे पाठविण्यात आले. पेण येथील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांकडे तिला उपचारासाठी घेऊन गेल्यावर डॉक्टरांच्या तपासणीमध्ये ती गरोदर असल्याचे समोर आले. डॉक्टरांना अल्पवयीन असल्याचा संशय आल्याने त्यांनी पीडितेचे आधारकार्ड व इतर कागदपत्रावरून तिच्या वयाची माहिती घेतली.

पान २ वर

## सामंतांविरोधात नातू आक्रमक

| रत्नागिरी | प्रतिनिधी

जिल्हा नियोजनच्या निधी वाटपावरुन सत्ताधारी पक्षांच्या आजी माजी आमदारांमध्ये चांगलीच जुंपली. या निधी वाटपावरुन भाजपचे माजी आमदार डॉ. विनय नातू पालकमंत्री उदय सामंत यांच्या विरोधात चांगलेच आक्रमक झाले. यावेळी जिल्ह्यातील फक्त दोन तालुक्यात जास्त निधी दिला जात असल्याचा आरोप नातू यांनी केला.

रत्नागिरी जिल्ह्यात जिल्हा नियोजन समिती मार्फत दोन तालुक्यातील काढलेल्या कामामध्ये अनियमितता असल्याने याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी भाजपाचे माजी आमदार डॉ. विनय नातू

पान २ वर

## मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी बाहेरच राहणार

| मुंबई | प्रतिनिधी |

२००६ साली मुंबईत झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींना निर्दोष ठरवण्याचा निकाल काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने दिला होता. या निकालाला राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. राज्य सरकारच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला स्थगिती दिली आहे. मात्र, असे करताना निर्दोष ठरल्यामुळे तुरुंगातून सोडलेल्या आरोपींना पुन्हा तुरुंगात जाण्याची आवश्यकता नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

पान २ वर

#### तुषार मेहता यांचा युक्तिवाद

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सरकारच्या बाजूने युक्तिवाद सादर केला. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश व न्यायमूर्ती एन. के. सिंह यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने सुटका केलेल्या आरोपींना लगेच पुन्हा तुरुंगात टाकले जावे, अशी राज्य सरकारची मागणी नसल्याचे तुषार मेहता यांनी नमूद केले. या प्रकरणात उच्च न्यायालयाने मांडलेली निरीक्षणे भविष्यात इतर प्रकरणांत दाखला म्हणून दिली जाऊ शकतात, असेही तुषार मेहतांनी नमूद केले.

## ट्रम्प यांचा भारताला दणका

| वॉशिंग्टन | वृत्तसंस्था |

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा भारताची चिंता वाढवणारी भूमिका घेतली आहे. भारतासह इतर देशांमध्ये नोकर भरती करून नका, असा कठोर संदेश ट्रम्प यांनी गुगल, मायक्रोसॉफ्टसह इतर टेक कंपन्यांना दिला आहे. वॉशिंग्टनमध्ये आयोजित एका शिखर परिषदेत ते बोलत होते. ट्रम्प यांनी अमेरिकेतील कंपन्यांना अमेरिकेतील लोकांनाच नोकरीवर घेण्याचा सल्ला दिला आहे.

ट्रम्प यांनी एआय समिटवेळी भारतीयांना आणि इतर परदेशातील नागरिकांना नोकरी देण्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच अमेरिकेतील तंत्रज्ञानाधारित कंपन्यांमध्ये परदेशी व्यक्तींना घेण्यावरून टीका केली. परदेशी नागरिकांना कंपन्यांमध्ये घेतले जात असून, त्यामुळे अमेरिकेतील गुणवत्तेकडे दुर्लक्ष केले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे, असे ट्रम्प म्हणाले. भारतीय अभियंत्यांना नोकऱ्या देण्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. त्यांनी भारतीयांना नोकरी देण्याबद्दल जाहीरपणे विरोध केला आहे. त्यामुळे अमेरिकेतील गुणवत्ता डावलली जात असल्याचे सांगत त्यांनी टेक कंपन्यांवर निशाणा साधला आहे. जगातील अनेक मोठंमोठ्या कंपन्यांची सूत्रे भारतीयांच्या, भारतीय वंशांच्या व्यक्तीच्या हातात आहे. याच अनुषंगाने ट्रम्प यांनी हे विधान केले.

#### ट्रम्प टेक कंपन्यांवर संतापले?



चीनमध्ये फॅक्टरी सुरू करण्यापेक्षा आणि भारतातील अभियंत्यांना नोकऱ्या देण्यापेक्षा अमेरिकन कंपन्यांनी आता मायदेशात रोजगार निर्मितीवर लक्ष द्यायला हवे, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले. काही अमेरिकन कंपन्या स्वातंत्र्याचा फायदा घेऊन भरपूर नफा मिळवत आहेत आणि दुसऱ्या देशात जाऊन गुंतवणूक करत आहेत. आता ट्रम्प यांचा काळ आहे. आता ते दिवस संपले आहेत, असा धमकीवजा इशाराच ट्रम्प यांनी गुगल, मायक्रोसॉफ्टसह इतर टेक कंपन्यांना दिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट चीन आणि भारताचा उल्लेख केला आहे.

## एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के भाडेवाढ रद्द | एसटी महामंडळाने घेतला महत्वपूर्ण निर्णय

# चाकरमान्यांचा गावाकडील प्रवास होणार सुखकर

| रायगड | प्रतिनिधी |

चाकरमान्यांच्या भावना लक्षात घेता यंदा गौरी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमानी-प्रवाशांच्या एकेरी गट आरक्षणावरील ३० टक्के भाडेवाढ मागे घेण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ गेली ७७ वर्षापेक्षा जास्त काळ महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित आणि किफायतशीर प्रवासी सेवा देत आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेला फायदा-तोट्याचा विचार न करता दैनंदिन प्रवासाबरोबरच सण, यात्रा, उत्सव, लग्नकार्य यासाठी एसटी



वेळेवर उपलब्ध करून दिली जाते. विशेषतः गणपती उत्सव, आषाढी यात्रा, होळीचा उत्सव यासाठी प्रवाशांच्या मागणीनुसार गट आरक्षणासाठी मोठ्या प्रमाणात बसेस उपलब्ध करून दिल्या जातात. यंदाही मुंबई व उपनगरातील चाकरमानी, प्रवाशांच्या मागणीनुसार तब्बल ५ हजार जादा एसटी बसेस गणपती उत्सवासाठी सोडण्याचे नियोजन एसटीने केले आहे.

प्रवासी केवळ एकेरी आरक्षण करीत असल्यामुळे परतीच्या प्रवासात एसटी बस मोकळ्या आणाव्या लागतात. त्याचा प्रचंड मोठा आर्थिक फटका एसटीला बसतो. सण उत्सवासाठी राज्यभरातील इतर ठिकाणाहून बसेस एकत्रित करून प्रवाशांना उपलब्ध करून दिलेल्या असतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर बसेसची कमतरता निर्माण होते. हे लक्षात घेता हा तोटा आणखीन वाढला जाऊ शकतो. त्यामुळे एकेरी गट आरक्षण करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटावर ३० टक्के भाडे वाढ करण्याचा निर्णय महामंडळाने नाईलाजाने घेतला होता. परंतु, मुंबई व उपनगरातील मराठी चाकरमान्यांच्या भावना

पान २ वर

> गणपती उत्सव, मुंबईचे चाकरमानी आणि एसटी यांचे एक अतूट नाते आहे. कोकणी माणसाचे एसटीवर प्रचंड प्रेम आणि विश्वास आहे. त्यामुळे तोटा सहन करूनही एसटी गणपती उत्सव, दिवाळी, होळी यासारख्या उत्सव काळात चाकरमान्यांना नेहमीच सेवा देत आली आहे. वाढत्या तिकीट दराच्या तुलनेमध्ये एसटीचे तिकीट दर हे अत्यंत कमी आहे. त्यामुळे एसटीने तत्कालीन दरवाढ केल्यास प्रवाशांनी त्याला सहकार्य करावे.
>
> –प्रताप सरनाईक, परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, एसटी महामंडळ

# बँक ऑफ बडोदा बनली 'निक्षय मित्र'

## • २० क्षयरुग्णांना घेतले दत्तक



**। रायगड । वार्ताहर ।**

**प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमात बँक ऑफ बडोदाने आपला मोलाचा सहभाग नोंदवित २० क्षयरुग्णांना दत्तक घेतले आहे. या रुग्णांना नियमित पोषण आहार पुरवून त्यांच्या आरोग्य सुधारणेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्याची जबाबदारी बँकेने स्वीकारली आहे.**

बँक ऑफ बडोदाच्या स्थापनेच्या दिवशी, अलिबाग, रेवदंडा व चणेरा शाखांच्या संयुक्त विद्यमाने दत्तक घेतलेल्या क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याआधी सर्व बँक, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेट क्षेत्र व अधिकारी वर्गांना 'निक्षय मित्र' होण्याचे आवाहन केले होते. त्यास सकारात्मक प्रतिसाद देत बँक ऑफ बडोदा ही 'निक्षय मित्र' बनली.

दरवर्षी रायगड जिल्ह्यात सरासरी ४ हजार ५०० क्षयरुग्ण आढळतात. त्यांच्यावर प्रभावी उपचारासोबत पोषण आहाराचा पुरवठा झाल्यास उपचार अधिक यशस्वी होतात, हे लक्षात घेऊन जिल्हा क्षयरोग केंद्रामार्फत 'निक्षय मित्र' उपक्रम राबविला जात आहे.

या उपक्रमाच्या वितरण सोहळ्याला बँक ऑफ बडोदा अलिबाग शाखेचे व्यवस्थापक चैतन्य मुड, चणेरा शाखेचे व्यवस्थापक श्री. शशिकांत चौगुले, रेवदंडा शाखेचे व्यवस्थापक श्रीकृष्ण खंदारे, तसेच जिल्हा क्षयरोग केंद्राचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

'निक्षय मित्र' उपक्रमातून दानशूर संस्था, कंपन्या व व्यक्तींनी पुढाकार घेतल्यास क्षयरोग निर्मूलनाच्या दिशेने समाज एक पाऊल पुढे टाकू शकतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.




# रोटरीमध्ये सेवेचे सूर्य कधीच मावळत नाही

## प्रांतपाल नितीन ढमाले यांना विश्वास

। रोहा । प्रतिनिधी ।

रोटरी क्लब या सामाजिक संस्थेचे २२० देशात काम चालू असून, २०० कोटींपेक्षा अधिक कार्यकर्ते या संस्थेत काम करत आहेत. या संस्थेत स्वतःच्या खिशात हात टाकून समाजसेवा करणारे सदस्य असल्यामुळे लोकं मंदिर-मस्जिदनंतर रोटरीकडे धाव घेतात. आपल्या समाजातील उपेक्षित घटक जोपर्यंत उपाशी झोपणार नाही, तोपर्यंत रोटरीचे काम संपणार नाही. खिशाला पिन लावून नाही, तर रोटरीचे कार्य आपल्या रक्तात भिनले पाहिजे. तोपर्यंत तो खरा रोटरीयन होऊन शकत नाही असे सांगत जगभरात या संस्थेच्या कामाचा पसारा पाहता रोटरीमध्ये सेवेचा सूर्य कधीच मावळणार नाही, असा विश्वास नितीन ढमाले यांनी व्यक्त केला.

रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रल या संस्थेच्यावतीने सोमवार (दि.२१) रोजी सायंकाळी ज्येष्ठ नागरिक सभागृहात आठव्या पदग्रहण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नूतन अध्यक्ष अध्यक्ष विजय दिवकर, सचिव राकेश कागडा, खजिनदार दिलीप देशमुख, मावळते अध्यक्ष रामा नाकती, असिस्टंट गव्हर्नर संजय नारकर, मयूर दिवेकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून जय गणेश मित्र मंडळ भुवनेश्वर, माजी नगरसेविका स्नेह अंबरे, प्राणीमित्र कुमार देशपांडे, पदवीधर विद्यार्थी म्हणून अनस चोरडेकर, सखाराम बरजे, यश तेंडुलकर, विभा चोरगे, अश्विनी चांगु मोरे, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्था रायगड तसेच इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. प्रास्ताविक व अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना विजय दिवकर यांनी संस्थेच्या कामाचा लेखाजोखा मांडला. रामा नाकती यांच्या माध्यमातून संस्थेचा टीआरपी वाढला असून वर्षभरात या संस्थेच्यावतीने रक्तदान शिबीर, शालेय विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, वृक्षारोपण, फन फेअर, दहीहंडी फोडणाऱ्या तरुणांचा सत्कार, दंत चिकित्सा शिबीर इत्यादी सामाजिक उपक्रम पार पडल्याची माहिती विजय दिवकर यांनी दिली.

# लायन्स अलिबागच्या ओरिएंटेशन वर्कशॉपचे यशस्वी आयोजन



**। अलिबाग । वार्ताहर ।**

येथील लायन्स क्लब ऑफ अलिबागचे ओरिएंटेशन वर्कशॉप सन्मान हॉटेलच्या सभागृहात संपन्न झाला. लायन अध्यक्ष प्रदीप नाईक यांनी प्रास्ताविकातून नवीन लायन मेंबर्ससाठी हे प्रशिक्षण मार्गदर्शक असल्याचे सांगताना हंगर, यूथ, डायबिटीस, व्हिजन, एन्व्हायरनमेंट अशा विविध अंगांनी समाजाची सेवा करणे हा लायन्स क्लबचा मुख्य हेतू असून, क्लबच्या मार्गदर्शक सूचनांसह लायन्स परिवारात नेतृत्वगुण विकसित करणे आणि त्यासाठी आवश्यक मनोबल वाढवण्यासाठी सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

यामध्ये एफडीआय ग्रॅज्युएट लायन नेहा बांदेकर यांनी लायन्स क्लबची निर्मिती, पूर्व इतिहास यांची पीपीटीद्वारे सविस्तर माहिती दिली. फर्स्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन प्रवीण सरनाईक यांनी क्वेशनक्विझच्या माध्यमातून अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात मूल्यमापन केले. तर, माइंडसेट ट्रेनर लायन दीपाली सहयोगी यांनी मनोबल वाढवण्यासाठीचे विविध फंडे समर्पक उदाहरणातून मांडले.

यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये अलिबाग लायन अध्यक्ष प्रदीप नाईक, पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन अनिल जाधव, फर्स्ट व्हाइस डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन प्रवीण सरनाईक, सेक्रेटरी महेश कवळे, ट्रेझरर अमोघ किंजवडेकर, फर्स्ट व्हीपी महेश चव्हाण, रिजन चेअरपर्सन गिरीश म्हात्रे, झोन चेअरपर्सन विकास पाटील, डॉ. रेखा म्हात्रे, डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर व्हिजन लायन अनिल म्हात्रे, डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर चेक डॅम लायन नयन कवळे, डायमंड अध्यक्ष श्रुती सरनाईक, प्रियदर्शनी पाटील, संतोष पाटील, महेंद्र पाटील, परेश भतेजा, नितीन शेडगे, अविनाश राऊळ, तुषार नाईक, अंकिता म्हात्रे, प्रदीप सिनकर, सनी सोगावकर, गुरुनाथ माळी यांच्यासह अलिबाग डायमंड, श्रीबाग, नागाव, मुरुड, माणगाव, मांडवा, पोयनाड येथील क्लबच्या पीएसटी टीमसह नवीन लायन मेंबर्स मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन मेंबर्सपैकी अनंत खाडीलकर यांनी हे प्रशिक्षण खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. या दिमाखदार सोहळ्याचे सूत्रसंचालन लायन सीमा शेडगे यांनी, तर आभारप्रदर्शन महेश कवळे यांनी केले.

# केंद्रवर्ती अर्थसंकल्प अर्ज मुदतवाढ

**। रायगड । वार्ताहर ।**

आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना थेट डीबीटीद्वारे लाभ मिळविण्यासाठी पोर्टलवरून १५ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, अनेक लाभार्थ्यांना पोर्टलवर अर्ज सादर करताना अडचणी येत असल्याने आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे इच्छुक लाभार्थ्यांनी वैयक्तिक किंवा सामूहिक लाभाच्या योजनेसाठी मुदतीत संकेतस्थळावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

**पनवेल महानगरपालिका**

**शुद्धीपत्रक**

दि.२२-०७-२०२५ रोजी निविदा सुचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. परंतु सदर सुचनेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु.(GSTसह) | निविदा अनामत रक्कम (रु.) | | कोरी निविदा किंमत रु. (GST सह) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुळ सुचनेतील नमुद केलेली रक्कम | सुधारीत रक्कम रु. | मुळ सुचनेतील नमुद केलेली रक्कम | सुधारीत रक्कम रु. |
| १. | मोबाईल ॲप्लिकेशनच्या सहाय्याने नव्याने लागवड झालेल्या झाडांची नोंद करणे व झाडे तोडणी प्रक्रियेच्या व्यवस्थापना साठी मोबाईल ॲप्लिकेशन व डॅशबोर्ड तयार करणेबाबत. | ९,९०,०००/- | २,०००/- | ९,९००/- | ५००/- | ५९०/- |

१. या कामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा दि.२२-०७-२०२५ पासून दि.२८-०७-२०२५ पर्यंत सायं.३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) पनवेल महानगरपालिका वृक्ष प्राधिकरण विभागात उपलब्ध होतील.
२. अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत, लखोटा क्रं.१मध्ये सादर करण्याचा आहे.
३. सीलबंद निविदा दिनांक २८-०७-२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागात स्वीकारण्यात येतील.
४. प्राप्त झालेल्या निविदा शक्य असेल तर दि. २९-०७-२०२५ रोजी दुपारी ३.०० नंतर उपायुक्त वृक्ष प्राधिकरण विभाग यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
५. प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजर अथवा नामंजूर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र./पमपा/PMC-PARK0193/2/2025-PTAD

# अलिबागमध्ये आयुष्मान भारत कार्ड वाटप

## • ८७८ जणांनी घेतला लाभ



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

अलिबागमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहर प्रमुख संदीप पालकर यांच्यातर्फे गेल्या तीन दिवसांपासून एस.टी. स्टँडजवळ मोफत आयुष्मान भारत कार्ड वाटप कार्यक्रम घेण्यात येत असून, पुढील चार दिवस हा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग मोफत आभा कार्ड वाटप कार्यक्रम घेण्यात येत असून, आतापर्यंत श्रीबागमधील ३७८ व एस.टी. स्टँडजवळ आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ५०० असा एकूण ८७८ जणांनी याचा लाभ घेतला आहे. अजून पुढील चार दिवस हा कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# गोरक्षकांना गायीला जीवदान

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

राज्यातील गोमाता आणि देशी गोवंशाच्या जतनासाठी सरकार पावले उचलत आहे. २२ जुलै रोजी शुद्ध देशी गोवंश जतन व संवर्धन दिन साजरा केला जातो. देशी गायींच्या उपयोगिता व आरोग्यदायी लाभांविषयी माहिती देणारे उपक्रम घेतले केले जातात.



पाली शहरात लंपी या आजाराने आजारी पडलेल्या एका गायीला संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याशी संवाद साधून औषधोपचार करून त्या गायीचे जीवन वाचविण्यात गोरक्षक दिपेश लहाने आणि सहकारी यांना यश आले. यांनी केलेल्या कार्याचे गोरक्षक भावेश बेलोसे यांनी कौतुक केले.

पान १ वरून

## ८८.९२ कोटींचे केटामाईन जप्त

व्यवहारात अनेक व्यक्ती तसेच लहान रासायनिक युनिट्स सामील असल्याचा संशय असून, याप्रकरणी मच्छिंद्र भोसले (रा. जिते, ता. महाड), सुशांत पाटील (रा. मोहप्रे, ता. महाड), शुभम सुतार (रा. पाचगाव, ता. करवीर, जि. कोल्हापूर) व रोहन गवस (रा. ५०१ मार्बल आर्च मित्तल कॉलेजजवळ, चिंचोली बंदर, मालाड वेस्ट, मुंबई) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईबाबत कोकण परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक संजय दराडे यांनी कारवाई पथकाचे अभिनंदन केले.

याबाबत महाड औद्योगिक पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे पोलीस नाईक इकबाल चांदका शेख (वय ३५) यांनी याबाबतची खबर दिली असून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे व उपविभागीय पोलीस अधिकारी माणगाव पुष्कराज सूर्यवंशी यांच्या पथकाने ही कारवाई केली. यामध्ये महाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने, महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष जाधव, शफी गोरेगावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक खाडे, पोलीस हवालदार गायकवाड, पोलीस नाईक बोटे, शेख, दराडे, दरेकर, गायकवाड, महाड शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी कांबळे, सोंडगीर, कदम, संपते ,आंधळे ,चिले, कोल्हापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, सफी शनेकर, पोलीस शिपाई कांजर, कोळी, बिरादार, भोईर, कारकुंड, गुरव, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे, पोलीस हवालदार पहेलकर व पोलीस शिपाई सोंडकर यांच्या पथकाने ही कारवाई केली असून संपूर्ण नेटवर्क उघड करण्यासाठी पथकाकडून अधिक माहिती गोळा केली जात आहे.

महाड औद्योगिक वसाहत पोलिसांनी केलेली कारवाई म्हणजे अमली पदार्थांच्या बेकायदेशीर साखळीवर मोठा आघात असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस विभागातर्फे सांगण्यात आले. मात्र या घटनेमुळे महाड औद्योगिक वसाहतीमधील अनेक बंद पडलेल्या कंपन्यांमध्ये अशाच प्रकारे बेकायदेशीररित्या रात्रीच्या सुमारास अमली पदार्थ बनवण्याचा धंदा चालत असल्याचे कंपन्यातील कामगारांकडून चर्चिले जात आहे.

## रशियन विमानाचा लँडिंगदरम्यान अपघात

या अपघाताबाबत बोलताना प्रादेशिक गव्हर्नर वसिली ऑर्लोव्ह म्हणाले की, प्राथमिक माहितीनुसार, विमानात पाच मुलांसह ४३ प्रवासी होते, ज्यात सहा क्रू मेंबर्स होते. विमानाचा शोध घेण्यासाठी सर्व आवश्यक सैन्य आणि संसाधने तैनात करण्यात आली आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये, याच अमूर प्रदेशात नोंदणीकृत नसलेल्या उड्डाणादरम्यान रॉबिन्सन आर ६६ हेलिकॉप्टर तीन जणांसह बेपत्ता झाले होते. हा प्रदेश मॉस्कोपासून अंदाजे ६,६०० किमी पूर्वेला आहे. दरम्यान, हेलिकॉप्टरमधून चित्रित केलेला आणि सोशल मीडियावर या अपघाताचा एक कथित व्हिडिओ प्रचंड मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यामध्ये घनदाट जंगलाच्या परिसरात विमानाचे अवशेष जळत असल्याचे दिसून येत आहे.

## मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी बाहेरच राहणार

त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालानंतर सोडलेले ११ आरोपी तुरुंगाबाहेरच राहणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

**उच्च न्यायालयाचा निकाल**

मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै रोजी २००६ मुंबई साखळी बॉम्बस्फोटांबाबत महत्त्वपूर्ण निकाल दिला. यात मकोका न्यायालयाने दिलेला निकाल रद्द ठरवून सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय देण्यात आला होता. मकोका न्यायालयाने १२ पैकी ५ आरोपींना फाशीची तर ७ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, पुरावे पुरेसे नसल्याचे व साक्षीदारांच्या साक्षी १०० दिवसांनंतर नोंद झाल्यामुळे त्या ग्राह्य धरता येणार नसल्याचे नमूद करत मुंबई उच्च न्यायालयाने सर्व १२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

## चाकरमान्यांचा गावाकडील प्रवास होणार सुखकर

लक्षात घेता, यंदा एकेरी गट आरक्षणावरील ३० भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे.

मागील वर्षी एसटी महामंडळाने गणपती उत्सवासाठी जाताना ४३३० बसेस व परतीच्या प्रवासासाठी ११०४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. एकेरी गट आरक्षणामुळे गणपती उत्सवाच्या काळामध्ये प्रवाशांना कोकणात त्यांच्या इच्छितस्थळी पोहोचून रिकाम्या बसेस परत आणाव्या लागल्या. त्यांना परतीच्या प्रवासासाठी बसेस उपलब्ध करून देताना रिकाम्या बसेस राज्याच्या विविध भागातून कोकणात पाठवाव्या लागल्या. त्यामुळे इंधन खर्च, चालक वाहकांचे वेतन, आपत्कालीन भत्ता याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा एसटीवर पडला. यातून गणपती उत्सवाच्या काळामध्ये मिळालेल्या उत्पन्नामध्ये तब्बल ११ कोटी ६८ लाख रुपयांचा तोटा महामंडळाला सहन करावा लागला. यंदा ५ हजार बसेस सोडण्याचे नियोजन आहे. या सर्व बसेस एकेरी गट आरक्षणासाठी आरक्षित झाल्यास हा तोटा १३ ते १६ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता आहे.

## सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींचे समुद्रात विसर्जन

या पार्श्वभूमीवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. त्यावेळी गणेशोत्सव पुढील महिन्यात असून पाच फुटांपर्यंतच्या एक लाख दहा हजार गणेशमूर्तींचे विसर्जन करण्याच्या दृष्टीने २०४ कृत्रिम तलावांची सुविधेची तयारी करण्यात आली आहे. मोठ्या मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन करण्यात अनेक अडचणी आहेत. या मूर्तींचे समुद्र आणि अन्य नैसर्गिक तलावांतच तूर्त तरी विसर्जन करण्याशिवाय पर्याय नसल्याची भूमिका सरकार आणि महापालिकेने पुन्हा एकदा न्यायालयात मांडली.न्यायालयाने मात्र सात हजारांहून अधिक मोठ्या मूर्तींचे समुद्रात किंवा अन्य जलस्रोतांत विसर्जन करू देऊ शकत नाही. ही संख्या फार मोठी आहे. सरकारने काहीतरी तोडगा काढावा, असे न्यायालयाने म्हटले. परंतु, सरकार आणि महापालिकेने अडचणींचा पाढा वाचणे सुरूच ठेवल्याने अखेर न्यायालयाने पाचऐवजी सहा फुटांपर्यंतच्या मूर्तींना कृत्रिम तलावांत विसर्जनाची अट घातली. तसेच, कृत्रिम तलावांतील पीओपी मूर्तींच्या विसर्जनाची उंची पुढील वर्षी वाढवण्याची सूचना सरकारला केली. यंदाचे आदेश हे गणेशोत्सव, नवरात्रोत्सव आणि माघी गणपतीपर्यंत लागू राहतील, असेही न्यायालयाने प्रामुख्याने स्पष्ट केले.

## पेण येथील १६ वर्षांच्या मुलीचा बालविवाह

त्यानंतर या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून पुढील तपासासाठी हा गुन्हा पनवेल तालुका पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. सध्या वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक गौरव इंगोले हे या प्रकरणाचा तपास करीत आहेत. अल्पवयीन मुलगी ही माहिती असतानाही पतीने तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार संबंधित पीडिताने पोलिसांना दिलेल्या जबाबात म्हटले आहे.

## सामंतांविरोधात नातू आक्रमक

यांनी केली आहे. याविषयी बोलताना नातू म्हणाले की, रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीमधुन सन २०२४/२५ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या तांडावस्ती विकास योजनेचा आढावा घेतला असता, सन २०२४/२५ मध्ये १ कोटी १० लाख रूपये निधीची प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यापैकी राजापूर विधानसभा ९६ लाख, चिपळूण विधानसभा १५ लाख निधी वितरीत करण्यात आला. यामध्ये भिन्नता असल्याचे नातू यांनी स्पष्ट केले. तर डॉ. विनय नातू हे महायुतीतील नेते आहेत. त्यांना जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपावरुन काही शंका असेल तर त्यांनी आपल्याबरोबर चर्चा करावी. निधी वाटपात कोणतीही तफावत नाही, असे रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

**ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

ग्रुप ग्रामपंचायत सारळ, हद्दीत सन २५/२६ या आर्थिक वर्षाकरिता ग्रामनिधी योजनेअंतर्गत खालील कामांसाठी इच्छुक ठेकेदार यांचेकडून लिफाफा पद्धतीने दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधिचे नाव | अंदाजित रक्कम | ईसारा रक्कम | निविदा सादर अंतिम |
|---|---|---|---|---|---|
| १. | सारळ अदिवाशीवाडी स्मशानभूमी निवारा शेड बांधणे.व दुरुस्ती करणे | ग्रामनिधी | ४५००००/- | १% | ६/०८/२०२५ सकाळी ११.०० पर्यंत |
| २. | सारळ स्मशानभूमी दुरुस्ती करणे | ग्रामनिधी | ७००००/- | १% | ६/०८/२०२५ सकाळी ११.०० पर्यंत |
| ३. | ग्रा.पं.सारळ हद्दीतील रस्त्यावरील खड्डे भरणे | ग्रामनिधी | २०००००/- | १% | ०६/०८/२०२५ सकाळी ११.०० पर्यंत |
| ४. | ग्रा.पं. सारळ हद्दीतील रस्त्यावरील दुतर्फा गवत काढणे. स्वच्छता करणे | ग्रामनिधी | दरपत्रकाप्रमाणे प्रति तास | १% | ०६/०८/२०२५ सकाळी ११.०० पर्यंत |
| ५. | म्हात्रोळी घोळ पाईप लाईन दुरुस्ती करणे | ग्रामनिधी | ११६०००/- | १% | ०६/०८/२०२५ सकाळी ११.०० पर्यंत |

**अटी शर्ती :**

१. कामाची इसारा रक्कम १ % राहील.
२. निविदा अर्जाची किंमत १००/- राहील.
३. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधित ठेकेदारास कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
४. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत कार्यालयात, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
५. ठेकेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीत जास्त १० टक्के कमी दराने निविदा भराव्यात. (कामाचा दर्जा चांगला राहावा याकरिता ग्रा.पं.ने तसा ठराव केला आहे.)
६. अंदाजपत्रकीय दरापेक्षा १० टक्के कमी दराच्या एकापेक्षा जास्त निविदा आल्यास चिठ्ठी टाकून निर्णय घेण्यात येईल.
७. वरिल साहित्य खरेदी करणे वेगवेगळ्या निविदा मोहोरबंद लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
८. निविदा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष अथवा पोस्टाने दि. ०६/०८/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजेपर्यंत निविदा प्राप्त होतील त्याच निविदा ग्राह्य धरण्यात येतील.
९. सदर विकास कामांकरिता निधी अंदाजपत्रकाप्रमाणे अदा करण्यात येतील.
१०. प्राप्त निविदा दि. ०६/०८/२०२५ रोजी दुपारी ठिक ०३.०० वाजता ग्रामपंचायतीत प्रशासक यांच्या हस्ते उघडण्यात येतील. व त्यावेळी ठेकेदारांनी समक्ष उपस्थीत रहावे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**निशा उ. चंदनकर**
**ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

**सही/-**
**सरपंच**
**श्री कैलास चौलकर**
**ग्रुप ग्रामपंचायत सारळ**

**त्वरीत पाहिजेत**

जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित श्रीमती सविता निळकंठ सावंत ज्यूनिअर कॉलेज (वाणिज्य) ह्या कनिष्ठ महाविद्यालयात स्वयं अर्थसहाय्यीत तत्वावर स.न. २०२५-२६ करीता खालील पद तातडीने भरणे आहे.

| अ.क्र | पदनाम | शै.पात्रता | विषय | पद |
|---|---|---|---|---|
| १. | सहाय्यक शिक्षक | एम.ए.बी.एड/ एम.कॉम.बी.एड. | इंग्रजी | ०१ जागा |

टिप- सदरचे पद हे सर्वांसाठी खुले आहे.

उमेदवारांनी आपल्या अर्जासह सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती घेऊन सोमवार दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मुलाखतीस हजर रहावे.

मुलाखतीचे ठिकाण - टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज
बामणोली रोड, माणगांव-रायगड, ४०२१०४.

**सेक्रेटरी**

# हातरिक्षा चालकांना मोठा दिलासा

## गुजरातच्या धर्तीवर पुनर्वसन करा; अहवाल सादर करण्याचे कोर्टाचे आदेश

**| माथेरान | प्रतिनिधी |**

**नुकताच माथेरान हातरिक्षा संदर्भात झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. निसर्गरम्य माथेरानमध्ये हाताने रिक्षा ओढण्याची प्रथा बंद झाली पाहिजे. येथील सर्व परवानाधारक हातरिक्षा चालकांचे गुजरातच्या धर्तीवर पुनर्वसन करता येईल का? त्याची चाचणी करा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला दिले आहेत. याबाबतचा अहवाल दोन आठवड्यांत सादर करण्यास कोर्टाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे माथेरानमध्ये मानवाला मानव ओढत असलेली अमानवीय परंपरा बंद होऊन हातरिक्षा ओढणाऱ्या चालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.**



जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असणाऱ्या माथेरान शहरात प्रथमच ई-रिक्षा पायलट प्रोजेक्ट चालवण्यात आल्यानंतर येथील २० हातरिक्षाधारकांना रिक्षा चालवण्यासाठी परवाना मिळाला. या काळात पर्यटकांनी घोड्यांची सफर त्याचबरोबर ई-रिक्षालादेखील भरभरून प्रेम दिले. यामुळे माथेरानचे पर्यटन वाढले. मात्र, माथेरानमधील हातरिक्षा चालकांची संख्या ९४ असून, सनियंत्रण समितीतने फक्त वीस जणांना ई-रिक्षा चालवण्याची परवानगी दिल्याने उर्वरित ७४ हातरिक्षा चालकांनाही रिक्षा चालवण्याचे परवाने द्यावेत, यासाठी श्रमिक हातरिक्षा चालक संघटना गेल्या काही वर्षांपासून प्रयत्न करीत आहे. यावर सरसकट सर्वांनाच ई-रिक्षा चालवायला देण्यास अश्वपाल संघटनेने मात्र विरोध केला होता. त्यामुळे हा वाद हा थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन पोहोचला होता. बुधवार, दि. २३ जुलै रोजी यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यासमोर सुनावणी झाली. त्यावेळी न्यायाधीशांनीदेखील माथेरानमधील चुकीची प्रथा बंद करून ई-रिक्षा चालवणे आवश्यक असल्याचे सांगितले.

गुजरात राज्यातील केवडिया या गावात सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारला असून, तेथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेट देतात. गुजरात सरकारने या गावातील महिलांसाठी ई-रिक्षा खरेदी करून त्या भाडेतत्त्वावर चालवण्यास दिल्या आहेत. त्यामुळे येथे पर्यटनवाढीसाठी चालना मिळाली आहे, असा मुद्दा यावेळी न्यायालयाने निदर्शनास आणला. माथेरानमधील परवानाधारक हातरिक्षा चालकांनाही ई-रिक्षा देणे आवश्यक असून, त्याबाबतचा अहवाल दोन आठवड्यांत सादर करा, असे निर्देश सरन्यायाधीश गवई यांनी महाराष्ट्र सरकारला दिले आहेत. या ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी स्थानिकांना आर्थिक मदत करावी, असेही त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे राज्य सरकारने लवकरात लवकर याबाबतची कार्यवाही करुन आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी येथील हातरिक्षा चालकांनी केली आहे.

### ‘ई-रिक्षांची संख्या वाढवावी’

**माथेरान फिरण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना ई-रिक्षेचा नक्कीच फायदा होत आहे. मात्र, सध्या फक्त वीस ई-रिक्षांना परवानगी दिली आहे. त्यापैकी १५ ई-रिक्षा या विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्याचे काम करतात. त्यामुळे उरलेल्या फक्त पाचच रिक्षा पर्यटक आणि स्थानिकांच्या सेवेत आहेत. या रिक्षांची संख्या वाढवली तर नागरिक व पर्यटकांना फायदा होणार असून, पर्यावरणदेखील राखले जाईल, असे श्रमिक हात रिक्षा संघटनेचे शकील पटेल व सचिव सुनील शिंदे यांनी सांगितले.**

## एनएमएमटी बस चालकाला मारहाण

**| रसायनी | प्रतिनिधी |**

नवी मुंबई महानगरपालिकेने प्रवाशांच्या सोयीसाठी कोरोना काळामध्ये वाशिवली (रसायनी) ते सीबीडी बेलापूर बससेवा सुरू केली आहे. वाशिवली येथून वळून बेलापूरकडे जात असताना वाशिवली येथे रामा कंपनीजवळ एनएमएमटीचे वाहन चालक यांना मारहाण करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मलप्पा यशवंत पुजारी (३९) हे आपल्या ताब्यातील बस वाशिवली गाव अशी घेऊन रामा कंपनीकडे वळवण्यासाठी गेले होते. यावेळी भास्कर पाटील व संतोष थोरवे यांनी त्यांना दमदाटी करत ही जागा माझ्या मालकीची आहे. त्यामुळे येथे बस वळवायची नाही, असे बोलून शिवीगाळ केली. भास्कर पाटील यांनी हातात असलेल्या काठीने मलप्पा पुजारी यांच्या उजव्या हाताला मारून दुखापत केली. तर, संतोष थोरवे यांनी बसच्या दरवाजाच्या आतमध्ये जाऊन शिवीगाळ करून हाथाबुक्क्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



**मुरूड समुद्रकिनारी कोळीबांधव मासेमारीसाठी सज्ज झालेत. बोटीवर जाळी चढवणे, इंधन, बर्फ भरण्याचे काम सुरू आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)**

## ॲड. विश्वनाथ भगत यांचा सन्मान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

देवा ग्रुप फाऊंडेशनचे कोकण प्रदेश सचिव ॲड. विश्वनाथ भगत यांच्या कार्याची दखल राज्यस्तरावर घेण्यात आली आहे. आनंदी युनिव्हर्स फाऊंडेशन या राज्यस्तरीय संस्थेने ॲड. विश्वनाथ भगत यांना कामाची पोचपावती दिली आहे. या संस्थेमार्फत देण्यात येणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार त्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथील समारंभात प्रदान करण्यात आला.




यावेळी व्यासपीठावर सिनेअभिनेत्री फाल्गुनी झेंडे, सिनेअभिनेत्री रंजना सिंग, डॉ. अविनाश सकुंडे, अनुर्वी फाऊंडेशनचे रवी अग्रवाल, आनंदी फाऊंडेशनचे गणेश विटकर आदी मान्यवर उपस्थित होते. देवा ग्रुप फाऊंडेशनचे कोकण प्रदेश सचिव ॲड. विश्वनाथ भगत हे पेशाने वकिलीमध्ये कार्यरत असले तरी सामाजिक आणि आरोग्य क्षेत्रात ते काम करीत आहेत. रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी समाजोपयोगी कार्यक्रमांबरोबरच आरोग्यविषयक समस्यांचे तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने निराकरण करण्यासाठी ते नेहमीच पुढे असतात. आजवर त्यांनी संस्थेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी आरोग्य शिबिरे घेऊन विविध आजारांबाबत समुपदेशन केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल आनंदी फाऊंडेशन या संस्थेने घेऊन त्यांना महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित केले.

## वडखळ-कांदळेपाडा रस्ता खड्ड्यात

**खरोशी** : वडखळ ते कांदळेपाडा या दिड किलोमीटरच्या अंतरापर्यंत काही वर्षांपूर्वी टाकलेले क्लेवर ब्लॉकची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे चालकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच बोरीफाटा ते वडखळ एसटी बसस्थानकापर्यंत डांबरीकरणाचा रस्ता बनवण्यात आला होता. मात्र, या रस्त्यावरदेखील मोठमोठे खड्डे पडल्याने त्याचाही नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अपघातांचा धोकाही निमर्ण झाला आहे. या खड्ड्यांकडे संबंधित खात्याने दुर्लक्ष केले असून, खड्डे बुजवण्याचा मुहूर्त शोधतात की काय, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.




## जबरी चोरी करणाऱ्याला ठोकल्या बेड्या

**| उरण | प्रतिनिधी |**

कोटनाका येथे राहणाऱ्या कुसुम तांडेल (६६) यांनी १२ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास दरवाजा उघडला असता बाहेर उभा असणाऱ्या आरोपीने बळाचा वापर करून त्यांच्या अंगावरील दागिने हिसकावले. त्यांच्या गळ्यातील साधारण ३ लाख ३७ हजार ४८० किमतीची साडेचार तोळे वजनाची सोन्याची चेन हिसकावून चारेटा पळून गेला.

याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. त्याप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपास सुरु केला. या पथकाचे अधिकारी संजय राठोड यांनी तपास केला व १५ जुलै रोजी आरोपी मोहित गोपाल कोहली (२६) याला नवघर येथून अटक करण्यात आली.

## उपसंचालक कार्यालयाची मनमानी

**| पाली | प्रतिनिधी |**

पालीतील आरोग्य विभागाच्या ठाणे उपसंचालक कार्यालयामध्ये प्रचंड अनागोंदी कारभार सुरू असून, वरिष्ठ अधिकारी मनमानी कारभार करीत आहेत. याच कार्यालयातील वरिष्ठ लिपिक शुभांगी रसाळ यांची पदोन्नती होऊन एक वर्ष झाले तरी त्या आपल्या मूळ पदस्थापनेवर हजर झालेल्या नाहीत. त्यामुळे त्यांना उपसंचालक कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी सतत पाठीशी घालत आहेत, असा आरोप बहुजन विद्यार्थी संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल वाणी यांनी केला आहे. तसेच, त्यांनी लेखी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्याचे आरोग्य विभागाचे सचिव निपुण विनायक यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी केली आहे.

आरोग्य विभागाच्या ठाणे उपसंचालक कार्यालयात गेल्या अनेक वर्षांपासून शुभांगी रसाळ या वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना मागील वर्षभरापूर्वी पदोन्नती देऊन सहाय्यक अधीक्षक या पदावर श्रीवर्धन येथील ग्रामीण रुग्णालय जसवली येथे पदस्थापना करण्यात आली. परंतु, वर्ष होऊन गेले तरी त्या आपल्या मूळ पदस्थापनेवर हजर झालेल्या नाहीत.

## एसटी थांब्यावरील अतिक्रमण हटविण्याचे आश्वासन

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील कडाव गावात असलेल्या एसटी प्रवासी थांब्यावर अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे. त्याविरोधात कर्जत प्रेस असोसिएशन, कर्जत प्रेस क्लब आणि रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी आंदोलन पुकारले होते. प्रशासनाने नमते घेत दोन दिवसात हे अनधिकृत बांधकाम पोलीस बंदोबस्तात निष्कासित करण्याचे स्पष्ट लेखी आश्वासन दिले आहे.

मागील दहा वर्षांपासून कडाव गावातील एसटी बस थांब्यावर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले होते. शासकीय




कागदपत्रांची पूर्तता, जागेची छाननी आणि पाहणी यानंतरही संबंधित बांधकामावर कोणतीही कारवाई होत नव्हती. त्यामुळे अखेर पत्रकारांनी थेट कृतीचा निर्णय घेत बेमुदत उपोषण पुकारले. २४ जुलै रोजी सकाळपासून कडाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात पत्रकारांनी उपोषण सुरू केले.

उपोषण सुरू झाल्यानंतर ग्रामविकास अधिकारी प्रेमसिंग गिरासे, सरपंच करुणा पवार, कर्जत एसटी आगार व्यवस्थापक दयानंद मोरे, महादेव पालवे, ग्रामपंचायत सदस्य सुभाष शिंदे, हर्षद भोपतराव आणि कर्जतचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बरोटे यांच्या उपस्थितीत संवाद झाला. यावेळी ग्रामपंचायतीच्यावतीने २६ जुलै रोजी पोलीस बंदोबस्तात हे अनधिकृत बांधकाम हटविण्यात येईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. या आश्वासनानंतर पत्रकारांनी तात्पुरते उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

### ८० पेक्षा जास्त जण गेले होते वाहून | १९८९ च्या महापुरातील मृतांना श्रद्धांजली

# दुर्दैवाच्या दशावताराला ३६ वर्षे पूर्ण

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

**सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा अंबा नदीला २३ जुलै १९८९ रोजीच्या मध्यरात्री महापूर आला होता. या महापुराला गुरुवारी (दि.२४) ३६ वर्षे पूर्ण झाली. दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील या महापुरात गतप्राण झालेल्या ८० ग्रामस्थांच्या स्मृती कायम राहाव्यात म्हणून बांधण्यात आलेल्या स्मृतीस्तंभाला ग्रामस्थ, शासकीय अधिकारी व विद्यार्थ्यांतर्फे भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.**



दुर्दैवाचे दशावतार काय असतात आणि एका रात्रीत महाप्रलयाचे तांडव किती भयानक असू शकते याचा प्रत्यय ३६ वर्षांपूर्वी सुधागड तालुक्यातील जांभुळपाडायागावातीलग्रामस्थांनी अनुभवला आहे. या महापुरात अनेकांनी आपली जिव्हाळ्याची माणसे गमावली. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. याबाबत दुःखद आठवणी सांगताना जे.बी. पाटील म्हणाले की, २३ जुलै १९८९ रोजी संध्याकाळी मुंबईवरुन बायकोच्या माहेरुन सर्वजण घरी आलो. नदीला तसे पाणी जास्त नव्हते. रात्री अडीच वाजता उठून बघतो तर काय सर्व घरात पाच फूट पाणी. आई, भाची (पाचवीत), मुलगा (अडीच वर्षाचा) आणि बायको सगळे गोंधळून गेलो. बघता बघता पाणी आठ-नऊ फूट वाढले. बायकोचा हात हातातून निसटला आणि ती डोळ्यासमोरुन वाहून गेली, मुलगा आणि मी वाहात जात एका झाडाला अडकलो. दुसऱ्या दिवशी गावकऱ्यांनी झाडावरुन काढले. घराकडे धाव घेतली असता आई आणि भाची स्वयंपाक खोलीच्या ओट्याच्या खिडकीला टांगून राहिल्या म्हणून वाचल्या. पण, कारभारीण मात्र गेली. आणि तिच्याबरोबर पोटातील आठ महिन्यांचे बाळदेखील गेले. सरकार दरबारी मृतांचा आकडा ८० असला तरी वास्तवात शेकडो लोकांना आपला जीव गमवायला लागला. या पुराचा फटका पाली आणि इतर गावांनादेखील बसला होता, असे त्यांनी सांगितिले.

यावेळी तहसीलदार उत्तम कुंभार, जांभुळपाडा सरपंच लिंबाजी शेंडे, पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर, माजी सरपंच रवींद्र खंडागळे, जयवंत बहाडकर, सुनील साठे, माजी सरपंच मिलिंद बहाडकर, माजी सभापती भारती शेळके, जे.बी. पाटील, भास्कर शेळके, रोहित भगत, अतिष खंडागळे, मिलिंद बहाडकर, मिलिंद शिंदे, ग्रामसेवक सचिन केंद्रे, तलाठी केंद्रे आदींसह ग्रामस्थांनी मृतांना श्रद्धांजली वाहिली.

## निवडक




### बसस्थानकाची सर्वेक्षण समितीकडून पाहणी

**बोर्लीपंचतन** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने राज्यभरात राबवण्यात येत असलेल्या ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान टप्पा-२’ अंतर्गत रत्नागिरी विभाग नियंत्रक प्रज्ञेश बोरसे यांच्या मूल्यांकन समितीमार्फत रायगड जिल्ह्यामध्ये सर्वेक्षण सुरू आहे. ते जिल्ह्यातील विविध बसस्थानकांना भेट देत आहेत. त्या अनुषंगाने श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन बसस्थानकाला मूल्यांकन समितीने बुधवारी (दि.२३) भेट देऊन पाहणी केली. यावेळी बसस्थानक परिसरातील स्वच्छता आणि प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत प्रवाशांचा अभिप्राय नोंदवून घेतला व स्थानकात उपलब्ध असलेल्या सेवेबद्दल समाधान व्यक्त केले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अतिक्रमण कारवाई अंतर्गत या बसस्थानकाची शेड जमीनदोस्त झाल्यानंतर नवीन बसस्थानकाच्या उभारणीसाठी आलेल्या अनेक अडचणी व ग्रामस्थांनी केलेल्या संघर्षामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने बसस्थानकाच्या उभारणीसाठी जागा उपलब्ध करुन दिली. परंतु, प्रवाशांच्या तुलनेने ही शेड खूपच छोटी असल्याने गर्दीच्या वेळी सामान रस्त्यावर घेऊन उभे राहावे लागते. तसेच, याठिकाणी एस.टी. उभी राहिली तरी वाहतुकीचा प्रश्न उभा राहतो. त्यामुळे या स्थानकाला लागून असणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोकळ्या जागेत विस्तारीकरण करण्याची मागणी प्रवाशांकडून मूल्यांकन समितीकडे करण्यात आली.



### इंदापूर-वाढवण रस्त्याची चाळण

**माणगाव** : माणगाव तालुक्यात इंदापूर ते वाढवण या सुमारे दीड किलोमीटर अंतरावरील रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय बनली आहे. या मार्गावर ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. त्यामुळे रस्त्याचे मूळ अस्तित्वच हरवले आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने प्रवास अधिक धोकादायक बनला आहे. परिणामी, स्थानिक नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच प्रवासी यांना अक्षरशः तारेवरची कसरत करत हा मार्ग पार करावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे पाणसई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विलास शिंदे यांनी लोकप्रतिनिधी व शासनाचे लक्ष वेधले आहेत.

इंदापूर ते वाढवण या रस्त्याचा वापर दररोज शेकडो नागरिक करतात. शाळकरी विद्यार्थी वाहनांमधून शाळेकडे जाताना होणारा धोकादायक प्रवास, तसेच रुग्णवाहिका अथवा आपत्कालीन सेवा यांना होणारा अडथळा ही या रस्त्याच्या दुरवस्थेची जिवंत उदाहरणे आहेत. दुचाकी स्वारांना तर जिवाची पर्वा न करता खड्ड्यांमधून मार्ग काढावा लागतो, त्यामुळे अपघात होण्याचा धोका कायम असतो. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पाणसई ग्रामपंचायतचे माजी सरपंच विलास शिंदे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडे पाठपुरावा करत या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करण्याची मागणी केली आहे. रस्त्याचे काम मागील काही महिन्यांपासून रेंगाळले असून, ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे स्थानिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे.



### दिवेआगरचा कचरा प्रकल्प बंदच

**दिघी** : श्रीवर्धन तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या दिवेआगर येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची उभारणी झाली. मात्र, उद्घाटन होऊन दोन वर्षे उलटली तरीदेखील हा प्रकल्प बंद स्थितीत आहे. जिल्हा वार्षिक नियोजनमधून नागरी सुविधा अंतर्गत दिवेआगर येथे कचरा विघटन प्रकल्प उभारण्यात आला होता. यासाठी ५० लाख एवढी अंदाजपत्रक रक्कम होती. तर, त्यापैकी बारा टक्के रक्कम ही ग्रामपंचायतीने द्यायची होती. दोन वर्षांपूर्वी या प्रकल्पाचे उद्घाटन खासदार सुनील तटकरे व मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर एकही दिवशी या ठिकाणी कचऱ्याचे विघटन झाले नाही. कचऱ्याचे विलगीकरन करून गावातील कचऱ्याची विल्हेवाट लावावी हा त्यामागचा उद्देश होता. मात्र, उपयोगशून्य ठरलेल्या या प्रकल्पामुळे त्यावर खर्च झालेली सर्व रक्कम वाया गेल्यासारखे आहेत.

### पनवेलमधून इसम बेपत्ता



**पनवेल** : बाथरूमला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक इसम अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार उलवा पोलीस ठाणे येथे करण्यात आली आहे. फाते गोसाय हेम्ब्रम, वय ३० वर्ष, रा. उलवे असे या इसमाचे नाव असून, उंची ४.५ इंच, केस काळे मध्यम, दाढी वाढलेली, मिशी मध्यम, अंगात नेसून लाल रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट, पायात काळ्या रंगाची चप्पल, भाषा-हिंदी बोलतो. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने उलवा पोलीस ठाणे किंवा पोहवा विशाल पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# कोणाकोणाला घालवणार?

देवेंद्र फडणवीस सरकारला सत्तेत येऊन जेमतेम सात महिने झाले आहेत. पण या इतक्या थोड्या काळातही सरकारने भानगडींचा विक्रम केला आहे. आधी जवळपास दोन महिने बीडमधील संतोष देशमुख हत्या प्रकरणावरुन वादळ चालू होते. अखेर धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्यावरच ते शमले. आता गेल्या चार महिन्यांमध्ये आणखी किमान चार-पाच मंत्र्यांच्या भानगडी बाहेर आल्या असून त्यांना पदावरून घालवावे अशा मागण्या चालू आहेत. आधी संजय शिरसाट यांच्या मुलाने कोट्यवधी रुपये खर्चून एका तारांकित हॉटेलवर कबजा करण्याचा प्रयत्न केला. नंतर संजय शिरसाट यांना प्राप्तिकर खात्याची नोटीस आली व शिरसाट पैशांच्या बॅगा घेऊन आपल्या बेडरुममध्ये बसल्याचे व्हिडिओ बाहेर आले. त्यानंतर संभाजीनगरचेच दुसरे मंत्री संदीपान भुमरे यांच्या पत्नीच्या नावे एका दिवसात दारु दुकानाचा परवाना हस्तांतरीत झाल्याचे प्रकरण उघडकीस आले. पावसाळी अधिवेशनात आणखी काही मंत्री व आमदार यांनी पराक्रम करून दाखवले. संजय गायकवाड यांनी आकाशवाणी आमदार निवासाच्या कँटिनमधील कर्मचाऱ्याला मारहाण करतानाचा व्हिडियो सगळीकडे प्रसारित झाला. गायकवाड हे लुंगी आणि बनियनवर बाहेर येऊन ही मारहाण करीत असल्याचे दिसले व खुद्द गायकवाड यांनी या सगळ्या प्रकाराचे समर्थन केले. इतके सगळे होऊनही गायकवाड यांच्यावर आजतागायत कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही. नोंद घेण्यासारखी बाब म्हणजे तोवर केवळ एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या आमदारांचीच प्रकरणे बाहेर येत होती. मग अजितदादांच्या गटाचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचे कथित प्रकरण बाहेर आले. विधिमंडळ चालू असताना कोकाटे मोबाईलवर रमी खेळत असल्याचे व्हिडिओ वेगाने सर्वत्र फैलावले. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने हा मुद्दा लावून धरला असून कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. एकीकडे शेती क्षेत्रासमोर अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत. असे असताना कोकाटे मात्र खुशाल रमी खेळत आहेत असे पाहून लोकांचाही संताप झाला आहे. त्यामुळे हा विषय चांगलाच तापला असून कोकाटे यांना काढले जाईल किंवा त्यांचे निदान खाते काढून घेतले जाईल असे दिसते.

### आमदार शिल्लक राहणार नाहीत

शिरसाट, गायकवाड व कोकाटे हे सर्वच जण पूर्वापार वादग्रस्त आहेत. अजित पवार राष्ट्रवादीतच होते तोवर शिरसाट रोज उठून दादांना शिव्या घालत होते. आपले एकेकाळचे नेते उद्धव ठाकरे यांना तर ते आजही वाटेल ते बोलत असतात. एकनाथ शिंदे यांना खूष करण्यासाठीचे हे सगळे उपद्व्याप असतात. गायकवाड हे बराच काळ आमदार असले तरी गावठी हिरोगिरी करण्यातच धन्यता मानत असतात. तलवारीने केक कापणे, राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्याला बक्षिस जाहीर करणे असले उद्योग त्यांच्या नावावर जमा आहेत. आतादेखील त्यांनी कँटिन कर्मचाऱ्याला मारहाण करण्याबद्दल त्यांनी एकाही अक्षराने पश्चात्ताप व्यक्त केलेला नाही. कोकाटे यांनी शेतीमंत्री म्हणून सतत वाद निर्माण केले आहेत. अवकाळी पावसाने नुकसान झाल्याची पाहणी करावी असे शेतकऱ्यांनी सुचवले असता माळरानावर येऊन मी काय करू असे त्यांनी विचारले होते. विमा योजनेबाबत बोलताना त्यांनी शेतकरी भिकारी आहेत असे सूचित केले होते. गंमत म्हणजे परवा यावर खुलासा करताना शेतकरी नव्हे तर सरकार भिकारी आहे असे आपल्याला म्हणायचे होते असे सांगून त्यांनी नवा वाद निर्माण केला. एरवी इतर पक्षांच्या मंत्र्यांबाबत मुख्यमंत्री थेट बोलत नाहीत. यावेळी मात्र देवेंद्रांनी कोकाटे यांचे रमी खेळणे आणि नंतर सरकारला भिकारी म्हणणे हे दोन्ही चुकीचे असल्याचे जाहीरपणे सांगितले. खुद्द दादा गटाच्या नेत्यांनीही कोकाटे यांचे वागणे बरोबर नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे आज ना उद्या त्यांना घालवले जाणार हे उघड आहे. विरोधकांच्या किंवा लोकांच्या दबावाखाली येऊन आपण हे केले नाही हे दाखवण्यासाठी काही वेळ घेतला जाईल इतकेच. पण या निमित्ताने प्रश्न असा आहे की दर एका भानगडीपायी एकेका मंत्र्याला घालवले तर पाच वर्षांमध्ये सत्तापक्षात मंत्री करण्यासाठी आमदारच शिल्लक राहणार नाहीत.

### खुद्द देवेंद्रांचे काय?

अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी योगेश कदम यांच्या कांदिवलीतील लेडिज बारचे प्रकरण अनिल परब यांनी काढले. हा बार आपलाच आहे, पण तो चालवायला दिला होता, त्यामुळे तिथे काय चालू होते आपल्याला ठाऊक नाही असे योगेश यांचे पिताजी रामदास कदम म्हणत आहेत. योगेश यांचा राजीनामा मागणाऱ्यांना घेऊनच दाखवा असे आव्हानही त्यांनी दिले आहे. गृहराज्यमंत्री स्वतःच एक बार चालवतो हा नवा महाराष्ट्र आहे आणि आता तो थांबणार नाही हे दिसतेच आहे. आतापर्यंत उघड झालेल्या भानगडींमधले समान सूत्र म्हणजे त्या सर्व शिंदे व दादा गटाच्या मंत्र्यांच्याच आहेत. पण काचेच्या घरात राहणाऱ्यांनी दुसऱ्यांच्या घरावर दगड मारू नयेत हा साधा नियम असतो. भाजपच्या मंत्र्यांच्या भानगडी बाहेर यायला फार वेळ लागणार नाही. नाशिकमधल्या कथित हनी ट्रॅपचे उदाहरण सर्वांसमोर आहेच. यामध्ये देवेंद्रांच्या जवळच्या गिरीश महाजनांवरच आरोप झाले. या प्रकरणात गुन्हा नोंदलेला लोढा व भाजपचे नेते यांचे काय संबंध आहेत अशी विचारणा होत आहे. मुख्यमंत्र्यांकडेच गृह खाते असल्याने अशी प्रकरणे सहज दडपली जाऊ शकतात. तरीही त्यांची वृत्तपत्रे व विरोधकांमधील चर्चा फार काळ थांबवता येणारी नाही. शिवाय, भ्रष्टाचार वगैरे भानगडी सोडा, पण सरकारच्या निर्णयांचा पंचनामा हादेखील भाजपवाल्यांसाठी पुरेसा आहे. परभणीच्या सोमनाथ सूर्यवंशीचे प्रकरण गंभीर आहे. सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारामुळे झालेला नाही असे मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात सांगितले होते. पण ते खोटे ठरले. औरंगाबाद खंडपीठाने पोलिसांवर ठपका ठेवून त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. एका अर्थाने ही खुद्द मुख्यमंत्र्यांनाच चपराक आहे. याबद्दल फडणवीसांनी काही प्रायश्चित्त घेणे तर सोडाच साधा खेदही प्रकट केलेला नाही. जनसुरक्षा कायदा आणि हिंदी-सक्ती याबाबतही मुख्यमंत्र्यांची लबाडी उघड झाली आहे. परवा गडचिरोलीत पोलाद प्रकल्पांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी आता नक्षलवादी जवळपास नामशेष झाल्याचे ते म्हणाले. जर नक्षलवादी संपले असतील तर इतका गाजावाजा करून आणलेला जनसुरक्षा कायदा कोणासाठी आहे या प्रश्नाचे उत्तर ते देत नाहीत. महाराष्ट्रातील मुले कित्येक वर्षांपासून पाचवीपासून हिंदी शिकत आली आहेत. मग फडणवीस यांना नवीन कोणते त्रिभाषा सूत्र आणणार आहेत? थोडक्यात मुख्यमंत्र्यांपासून ते खालपर्यंत सरकारचा कारभार कसा मनमानी, हडेलहप्पीपणे चालू आहे हे गेल्या सहासात महिन्यात पुरेसे दिसले आहे. राक्षसी बहुमतामुळे आलेली ही मुजोरी आहे. आज सुपात असणारे उद्या जनतेच्या जात्यात येणार आहेत.

## विचार

# हरवलेला श्रावण

***श्रावण सुरू झाल्यानंतर सणांची रेलचेल सुरू होणे आणि आनंदलहरींमध्ये भिजण्याची संधी मिळणे ही एके काळी सरधोपट जगण्याला हिरवे वळण देणारी गोष्ट होती. आज मात्र शहरांमध्ये श्रावणातील झुले नाहीत की घरोघरी ऐकू येणाऱ्या कहाण्या नाहीत. शिवामूठ, मंगळागौरीचे पूजन, जिवतीची पूजा, शुक्रवारचे हळदीकुंकू किती घरात होते हादेखील प्रश्न आहे. पण तरीही श्रावणाचे अप्रूप आहेच. ते कमी झालेले नाही.***



**उर्मिला राजोपाध्ये**

श्रावण मास... किती सुरेल, पवित्र आणि सजीव...! पावसाच्या सरींसोबतच भक्तिभावाने ओथंबून वाहणारा, देवपूजेमुळे गजबजणारा, कथा-कीर्तनांनी नादमय झालेला... मात्र प्रत्येक दिवशी देवळांसमोरच्या रांगा आणि प्रत्येक घरी व्रते, उपास, संकल्प यांची लगबग बघणारी, अनुभवणारी पिढी नक्कीच आज तो श्रावण कुठे हरवलाय, याचा विचार करत असेल. पूर्वी श्रावण हा केवळ महिना नसायचा, तर एक उत्सव असायचा. दिवसा- प्रहरानुसार विविध विधी, व्रते, कथा, कहाण्या, हरिपाठ, नामाचा जागर, नागपंचमीसारख्या सणांनिमित्त होणारी निसर्गपूजा, रक्षाबंधनाचा स्नेहबंध या सगळ्याचे संमिश्रण म्हणजे श्रावण. या संपूर्ण महिन्यात घराघरात गोडधोडाचा सुगंध दरवळायचा. आजीच्या कहाण्यांनी पहाट प्रसन्न व्हायची. आईच्या आरत्यांनी देवघरात नाद निर्माण व्हायचा. देव्हाऱ्यातला तेवणारा दिवा पावसाळी संध्याकाळ अधिक देखणी करुन जायचा. श्रावणाच्या आठवणींचा गाभा आजही अनेकांच्या मनात असाच आहे.

पूर्वी शाळांमध्ये या महिन्यात श्रावण महोत्सव साजरा व्हायचा. मुला-मुलींकडून कविता, नृत्य, फॅन्सी ड्रेस, भजने असे कार्यक्रम सादर व्हायचे. त्यात एक वेगळाच आनंद असायचा. दर सोमवारी शाळा लवकर सुटायची. त्या दिवशी आवर्जून शंकराच्या देवळात जायचे, मनोभावे पूजा करायचा आणि घरी येऊन लवकर उपवास सोडायचा हा परिपाठच होता. या महिन्यात कार्यानुभवही महत्त्वाचा असायचा. काही मुली घरीच भावासाठी राख्या करायच्या तर काही बनवून विकायच्या. वेगवेगळ्या प्रकारच्या रांगोळ्या घालायच्या. यातही आपल्या दारासमोरची रांगोळी वेगळी, वेधक कशी होईल, याचा विचार करत अनेक प्रयोग केले जायचे. मुलींमधील कलागुणांची जणू ती कार्यशाळाच असायची. अंगणात रांगोळ्या घालण्यापासून झेंडूच्या माळा करेपर्यंत आणि पुरणाच्या स्वयंपाकात आई-काकूला मदत करण्यासाठी डावी-उजवी बाजू बघत नैवेद्याचे ताट वाढण्यापर्यंतचे सगळे संस्कार या महिन्यात हसतखेळत व्हायचे. म्हणूनच व्रतवैकल्यांचा गजर करणारा श्रावण हा निसर्गाच्या आणि संस्कृतीच्या सहवासात रममाण होणारा काळ असायचा.

मात्र आज याचे स्वरुप बदलले आहे. तसा तर माणूसही बदलला आहे आणि निसर्गही बदलला आहे. माणसाची जीवनशैली तर आमूलाग्र बदलली आहे. आता सणांचे स्वरूप इन्स्टाग्राम स्टोरीपुरते मर्यादित झाले आहे. श्रावणातल्या उपवासाची जागा डाएट चार्टने घेतली आहे. कथा ऐकण्याची जागा ऑडिओ बुक किंवा व्हिडिओ यांनी व्यापली आहे. आता बऱ्याच घरांमधून आजी-आजोबांच्या तोंडचे नव्हे तर, यू-ट्युबवरील गुरुजींच्या तोंडचे मंत्रोच्चार कानी पडतात. देवळात जाणे म्हणजे ट्रॅफिकमध्ये अडकणे असे समजत घरातूनच हात जोडले जातात. थोडक्यात,

**देवघरात शांतता,**
**कथा ऐकणारे हरवले,**
**मॉलमध्ये 'श्रावण सेल' आहे,**
**पण ओवाळायचे हात हरवले**
**अशी आजच्या श्रावणाची कथा आहे.**

ग्रामीण भागात काही अंशी या महिन्याचे महत्त्व जाणवते. तेथे अजूनही जिवतीची पूजा होते. झाडांवर झुले लागतात. हारासाठी फुले बाजारात नव्हे तर, परसदाराच्या वेलींवर मिळतात. पण शहरांच्या धकाधकीत श्रावणाचा साज मात्र हरवला आहे. तो साजरा करण्याइतकी सवड निसर्ग आणि माणूस या दोघांकडेही उरलेली नाही. आता तर श्रावणात उन-सावलीचा खेळ खेळणारा पाऊसही मुसळधार कोसळत प्रलय घडवत आहे. तो आपली ओळख विसरून विद्ध्वंस घेऊन येताना दिसत आहे. पूर्वी झाडांच्या सळसळीत, चिमण्यांच्या किलबिलाटात, थंड वाऱ्याच्या गारव्यात श्रावण अवतरत असे. अलिकडच्या काळात तो गर्जत येतो आणि अंगणासमोर न नाचता थेट घरात घुसून उन्मादी अवतार दाखवून जातो. ऋतूचक्राचा हा बदलता अंदाजही श्रावणाला वेगळी किनार देणारा आहे.

पूर्वी सणवारात एक सामूहिकता होती. आत्ताच्या वैयक्तिकतेच्या युगात मात्र श्रद्धा म्हणजे व्हर्च्युअल आरती... त्यामुळेच सोशल मीडियाच्या ढगांआड श्रावणाचा तो सहज, सोपा आणि पवित्र गंध हरवल्यासारखा वाटतोय. त्यामुळेच श्रावण पुन्हा आधीसारखा साजरा व्हावा असे वाटत असेल तर क्षणाभोवती थोडे थांबायला हवे. अजूनही संधी आहे. निर्धार केला तर आपण पुन्हा एकदा श्रावणाला आपल्यात सामावू शकतो. गरज आहे ती थोडे थांबून निसर्गाकडे पाहण्याची. एखादे व्रत अंगिकारण्याची आणि ते मनापासून निभावण्याची. मुलांना पुन्हा एकदा कथांचे महत्त्व समजावून सांगण्याची. देव्हाऱ्यात दिवा लावून एकाग्रता राखत जप करण्याची. सर्वात महत्त्वाचे म्हणजे झगमगाट नव्हे तर मंद आणि शांत उजेडात एकमेकांसोबत काही वेळ निवांत घालवण्याची.

नव्या पिढीला श्रावणातील या शांततेचा अनुभव देणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्यातील हरवलेल्या आपलेपणासाठी याची गरज आहे. हे साधले तर 'श्रावण' या शब्दातले गूज त्यांना कळेल. यातील ओलावा ते अनुभवू शकतील. यातील भक्तीची अनुभूती घेऊ शकतील. त्यांच्या धावत्या, गजबजलेल्या दिवसांनाही एक शांत, निवांत अशी लय मिळेल. पावसाच्या रिमझिम सरींसह सामोरा येणारा हा महिना धार्मिकतेने कसा नटलेला आहे, हे त्यांना कळेल. मोबाईल नोटिफिकेशन्सच्या आड कुठे तरी लपून बसलेला श्रावण असा प्रत्यक्ष समोर आला तरच तो त्यांच्या मनाला भावेल. त्याच्याशी हळवे नाते जुळेल. अन्यथा, दिनदर्शिकेचे आणखी एक पान उलटण्यापेक्षा वेगळे काहीही घडणार नाही.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे श्रावणाचे रुप बदलण्यास पर्यावरणीय संकटांचाही मोठा हातभार आहे. विज्ञान सांगते की, हवामानातील अनियमितता आणि शहरीकरणाची वाढती गती यामुळे ऋतूंचे नैसर्गिक चक्रच बिघडले आहे. श्रावणही याला अपवाद नाही. ग्लोबल वॉर्मिंगमुळे भारतातील मॉन्सून पॅटर्नमध्ये स्पष्ट बदल दिसून येतो. भारतीय हवामान खात्याच्या अहवालानुसार पूर्वी ठराविक कालावधीत येणारा पाऊस आता अनियमित येतो आणि झोडपून काढतो. याचा थेट परिणाम शेती, जलसाठे आणि जैवविविधता धोक्यात येण्यावर होतो. खरे तर श्रावण हा निसर्गाशी समरस होण्याचा काळ आहे. सेंद्रिय खतांचा वापर, झाडे लावणे, वनसंवर्धन हे सारे समाजाचे सामूहिक उपक्रम पूर्वी याच महिन्यात राबवले जात असत. मात्र बदलत्या वातावरणात तेही मागे पडताना दिसत आहेत. आजच्या काळात हे सारे विस्मरणात गेले आहे. म्हणूनच आजच्या श्रावणाला आधुनिक भाषेत 'ऋतूसंवर्धन मास' अशी ओळख मिळणे गरजेचे आहे. या दृष्टीनेच आज त्याच्याकडे बघायला हवे. शास्त्र आणि श्रद्धा यांचा समन्वय साधून, पर्यावरणस्नेही सण कसे साजरे करता येतील याचा विचार करण्याची ही वेळ आहे. या मासामध्ये सजीव आणि निर्जीव सृष्टीचा समतोल जपण्याची परंपरा आपण आधी समजून घ्यायला हवी आणि नंतर ती जपायला हवी. श्रावण समजून घेताना पारंपरिक भारतीय जीवनपद्धतीत उपवास, आहारसंयम, झाडे लावणे, नद्यांचे पूजन, पर्जन्य यज्ञ, वनभोजन हे सर्व उपक्रम नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी कसे आणि किती महत्त्वाचे होते हे समजून घेणे गरजेचे आहे. आजच्या पिढीला यामागचा वैज्ञानिक दृष्टिकोन पटवून दिला तर तीदेखील मनापासून त्याचा अंगिकार करेल. उपवासामुळे शरीर डिटॉक्स होते, ऋतुपरिवर्तनाशी शरीर जुळवून घेते, झाडे लावणे म्हणजे हवामान नियंत्रणात मदत करणे हे त्यांना समजून सांगितले तर चित्र बदलण्यास फारसा वेळ लागणार नाही. आज आपण हे सर्व विसरून केवळ सोशल इव्हेंट्स म्हणून सण साजरे करतो. प्लास्टिकच्या पिशव्यांमधून पूजासाहित्य घरी आणले जाते. त्याचे विसर्जनही अयोग्य पद्धतीने होते. फटाके आणि मोठ्या ध्वनिक्षेपकांशिवाय सध्याचे सण साजरे होत नाहीत. पण या सगळ्याचा निसर्गावर गंभीर परिणाम होत आहे. आपल्या परंपरांचे 'विज्ञान' विसरल्यामुळे आज श्रद्धा फक्त दिखावूपणाच्या आवरणात अडकून राहिली आहे. म्हणूनच हे चित्र बदलण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यायला हवा. या निसर्गपूरक महिन्यामध्ये शाळांमधून 'ग्रीन श्रावण' उपक्रम राबवले गेले पाहिजेत. आपल्या भागातील जैवविविधता लक्षात घेऊन प्रत्येकाने श्रावणात एक झाड लावण्याचा संकल्प करावा.

## चर्चा आजची

# भारत बनणार स्वच्छ उर्जेमध्ये जगाचा मार्गदर्शक

**सुयोग आंग्रे**

नूतनीकरण योग्य उर्जेवरील आंतरराष्ट्रीय धोरणातील बदल देखील आवश्यक आहेत. यासाठी, तांत्रिक हस्तांतरणास आर्थिक संसाधने प्रदान करण्याचे धोरण केवळ उदार बनविणे आवश्यक नाही तर बऱ्याच जटिल बाबींची काळजी देखील घ्यावी लागेल. भारताच्या यशामुळे या प्रकरणात आशा वाढते. जर भारत हे ध्येय साध्य करू शकत असेल तर जग त्या दिशेने देखील जाऊ शकते.जीवाश्म इंधन पूर्णपणे सोडून देण्याची गरज नाही, परंतु त्यांच्यावर आणि नॉन-लिव्हिंग इंधनांमध्ये अवलंबित्व कमी करण्याच्या संतुलित धोरणात वाढत्या धोरणात्मक गुंतवणूकीकडे पुढे जाणे आवश्यक आहे. सौर, वारा, पाणी, अणू आणि जैव ऊर्जेमधील गुंतवणूक या धोरणाच्या मूळ भागात असावी. हे लक्षात घेण्यासारखे आहे की गेल्या दशकात सौर आणि पवन उर्जेची किंमत ८० टक्क्यांहून अधिक खाली आली आहे. यामुळे, अनेक भागातील सौर-पाण्याच्या उर्जेची किंमत देखील कोळसा आणि वायूमधून तयार झालेल्या विजेमुळे परवडणारी झाली आहे. नूतनीकरणयोग्य उर्जा किंमतींमध्ये टिकाऊपणा प्रदान करण्याबरोबरच उर्जा स्वातंत्र्य देखील सुनिश्चित करते. एकदा स्थापित झाल्यानंतर, त्यातील किंमत जवळजवळ नगण्य राहते. हे असे काही फायदे आहेत जे कधीही जीवाश्म इंधन समान करू शकत नाहीत. अशा क्षमतांवर भौगोलिक -राजकीय हट्टींबरोबर सहजपणे सामोरे जाऊ शकते, कारण ऊर्जा समृद्ध भागात ताणतणावामुळे पुरवठा साखळीचा परिणाम होतो. रशिया-युक्रेन युद्धाचे हे एक उत्तम उदाहरण होते. स्वच्छ घरगुती उर्जेमध्ये गुंतवणूक करणारे देश अशी अस्थिरता टाळू शकतात. हवामान बदलाच्या आव्हानास सामोरे जाण्यासाठी नूतनीकरणयोग्य ऊर्जा स्त्रोतांचा अवलंब करणे अधिक आवश्यक झाले आहे. कारण जागतिक ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जनामध्ये एकट्या जीवाश्म इंधन सुमारे तीन चतुर्थांश आहेत. इतके व्यापक फायदे असूनही, ही वस्तुस्थिती आहे की विकसित देशांनीसुद्धा स्वच्छ उर्जेची उद्दीष्टे पूर्ण करण्यास सक्षम नाहीत. प्रारंभिक पातळी मिळविल्यानंतर युरोपियन युनियनच्या चरणांनाही या आघाडीवर धक्का बसला. यामध्ये, राजकीय दबाव, किंमतींवरील चिंता आणि कार्बनच्या नियमांवरील निषेध यासारख्या पैलू मुख्यतः जबाबदार आहेत. एकीकडे, त्यांना कार्बन फूटप्रिंट कमी करावी लागेल, दुसरीकडे पायाभूत सुविधा तयार करणे, लोकांना रोजगार प्रदान करणे आणि अद्यापही त्यांच्या अर्थव्यवस्थेची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे की कोटी लोकांना दारिद्र्याच्या कक्षेतून बाहेर काढावे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, लोकसंख्या वाढ आणि या देशांमध्ये राहणीमान सुधारण्यामुळे उर्जेची मागणी आणखी वाढेल हे स्वाभाविक आहे. या परिस्थितीत भारताची कृत्ये उल्लेखनीय आहेत. यावर्षी जूनपर्यंत, देशातील एकूण स्थापित वीज क्षमतेतील ००.०८ टक्के हिस्सा नूतनीकरणयोग्य ऊर्जा बनली.

पॅरिस कराराअंतर्गत राष्ट्रीय निर्धारक योगदान म्हणजे एनडीसीचे लक्ष्य ठरविण्याच्या पाच वर्षांपूर्वी स्टॉप ओलांडला आहे. यात सौर, वारा, हायड्रोइलेक्ट्रिक, बायो आणि अणुऊर्जा समाविष्ट आहे. पंतप्रधान-कुसम आणि पंतप्रधान सूर्या घरासारख्या योजनांनी सौर उर्जा स्वीकारण्यास आरामदायक बनविले आहे, तर सौर उद्याने आणि पवन कार स्वच्छ उर्जेमध्ये गुंतवणूकीसाठी उपयुक्त ठरल्या आहेत. बायो -एर्जीच्या विस्ताराने ग्रामीण अर्थव्यवस्थेला पाठिंबा दर्शविला आहे. हेच कारण आहे की जी -२० देशांमध्ये कमीत कमी दरडोई उत्सर्जनासह भारत हा देश बनला आहे, ज्याने स्वच्छ उर्जा आघाडीवर उच्च आणि गगनभेदी उडी घेतली आहे. भारताची रणनीती देखील खूप व्यावहारिक आहे. तो अचानक जीवाश्म इंधन आणि कोळसा आणि गॅस -आधारित वनस्पतींमधून बचाव करीत नाही, अजूनही प्रमुख उर्जा पुरवठादार आहेत. २०३० पर्यंत भारताने-जिवॅश क्षमता ०० गिगावॅट आणि २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे, म्हणून ग्रिड आधुनिकीकरण, उर्जा साठवण, स्वच्छ तंत्रज्ञान सामग्री पुनर्वापर आणि ग्रीन हायड्रोजन यासारख्या आधुनिक इंधनांमध्ये गुंतवणूक वाढवावी लागेल. चीन देखील अशा क्षमता दर्शवित आहे. तो सौर पॅनेल, पवन टर्बाइन्स आणि इलेक्ट्रिक वाहनांचा सर्वात मोठा उत्पादक बनला आहे. तथापि, हे दुर्लक्ष केले जाऊ शकत नाही की हे जगातील सर्वात मोठे एमिटर आहे, ज्याची वीज अद्याप कोळशापासून बनविली आहे. नूतनीकरणयोग्य उर्जेचा विस्तार आवश्यक आहे, परंतु ते स्वतःच पुरेसे नाही आणि जीवाश्म इंधनांच्या सतत विस्तारात उत्सर्जन देखील सतत वाढेल.

अशा परिस्थितीत, कोणतीही रचना सर्वांसाठी प्रभावी असल्याचे सिद्ध होऊ शकत नाही. ग्लोबल साऊथला हे समजले पाहिजे की जीवाश्म इंधन रात्रभर मुक्त केले जाऊ शकत नाहीत, परंतु त्यांना नूतनीकरणयोग्य उर्जा स्त्रोतांवर संसाधने वाढवावी लागतात. नूतनीकरणयोग्य उर्जेवरील आंतरराष्ट्रीय धोरणातील बदल देखील आवश्यक आहेत. यासाठी, तांत्रिक हस्तांतरणास आर्थिक संसाधने प्रदान करण्याचे धोरण केवळ उदारमतवादीच नाही तर बऱ्याच जटिल बाबींची काळजी देखील घेईल. भारताच्या यशामुळे या प्रकरणात आशा वाढते. जर भारत हे ध्येय साध्य करू शकत असेल तर भारत स्वच्छ उर्जेमध्ये जगाचा मार्गदर्शक बनेल यात तिळमात्र शंका नाही.

## लोकसंसद

### लोकल प्रवाशांचे सर्वेक्षण करून उपयोग शोधा !

लोकलमधील गर्दी कमी कशी करायची हे रेल्वे प्रशासनापुढील मोठे आव्हान आहे. ब्रिटिशांनी शंभर-सव्वाशे वर्षापूर्वी सुरू केलेली वाहतूक व्यवस्था आजमितीस त्यांच्याच व्यवस्थेवर सुरू आहे. मध्य रेल्वे कसारा मार्ग व कर्जत मार्ग १२०-१०० किलोमीटर दूर आहेत. पश्चिम रेल्वे विरार आणि हार्बर पनवेल पर्यंत विस्तारले आहेत. मध्य रेल्वेमार्गाला पर्यायी मार्ग असायला हवा. पावसाळ्यातील रेल्वेमार्गावर प्रवास जीवावर बेततो. भायखळा रेल्वे स्टेशन पासून मुलुंड पर्यत सखल भाग असल्याने रेल्वेमार्गावर तीन फुट पाणी भरते.वाहतूक सेवा ठप्प होते.म्हणून या मार्गावरील सर्व स्टेशन जमिनीपासून उंचीवर हवीत. सद्य स्थितीत हे शक्य दिसत नाही. म्हणून नवीन मार्ग तयार केला तर भविष्यातील अडचणी कमी होतील. गर्दीची ठिकाणे परेल, दादर, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, मुलुंड, ठाणे, दिवा, डोंबिवली, कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, कर्जत, टिटवाळा, आसनगाव, कसारा, पश्चिम- चर्नीरोड, ग्रॅटरोड, मुंबई सेंट्रल, दादर, बांद्रा, सांताक्रूझ, विलेपार्ले, अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, बोरिवली, मीरा रोड, भाईंदर, वसई नालासोपारा, विरार- हार्बर- डॉकयार्ड, रे रोड, शिवडी ,गुरू तेगबहादूर नगर, कुर्ला, चेंबूर, गोवंडी, मानखुर्द, वाशी, बेलापूर, पनवेल. या विभागांची लोकसंख्या विचारात घेणे आवश्यक आहे. मुंबईतील मुंबई महानगरपालिकेच्या पंचवीस प्रभागातील प्रत्येक प्रभागाची लोकसंख्या किमान आठ ते नऊ लाखाच्या आसपास आहे. तसेच इतर शहरातील विभागांची संख्या त्यांच्या नगर रचनेनुसार आहे. मुंबई, ठाणे, रायगड, पालघर जिल्ह्यातील रेल्वेमार्गावरील प्रवाशांची ने-आण करते. किमान सत्तर लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. शिवाय मेल- एक्स्प्रेस गाड्यांतून येणारे प्रवाशी वेगळे. मुंबईतील लोक मुंबई बाहेर स्थलांतरित झाले.कल्याण- डोंबिवलीतून छत्रपती शिवाजीमहाराज टर्मिनसकडे येणारा प्रवासी आपल्या कार्यालयाच्या वेळेच्या आधी दोन तास घर सोडतो.लोकल वेळेवर असेल तर कार्यालयात वेळेवर पोहचतो. हीच परिस्थिती घरी जाताना असते. महिलांची तारेवरची कसरत असते, चूल, मूल सांभाळून कार्यालयात वेळेवर पोहचायचे असते. बेबीसिटर मध्ये मुलाला सोडून नंतर रेल्वे स्टेशन गाठावे लागते. वृद्ध, आजारी रुग्ण, वेगवेगळे आजार असलेल्या प्रवाशांचे डोळे गर्दी पाहून पांढरे होतात. कार्यालयीन वेळा बदलून प्रवाशांची हेळसांड होणार. धिम्या आणि तेज गाड्यांच्या प्रवासात पाच सात मिनिटांचा फरक पडतो. मध्य रेल्वेमार्गावर मेल - एक्स्प्रेस गाड्याही धावतात त्यांच्या वेळाही तेवढ्याच महत्वाच्या आहेत. पुढील पन्नास वर्षे प्रवास चांगला होईल अशी उपाययोजना रेल्वे प्रशासनाने करावी. **- महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**

## दिनविशेष

# अभिजात संगीतकार सुधीर फडके

मराठी घराघरात आणि मनामनात सुधीर विनायक फडके हे नाव अजरामर आहे. गीत रामायणातील गोडव्यापासून ते भावविभोर करून सोडणा-या गीतांतून मराठी मनाम नावर सुधीर फडके यांनी राज्य केले आहे. मराठी-हिंदी गीतांचे गायक व संगीतकार म्हणून त्यांनी ठसा उमटवला आहे. सलग पाच दशकांहून अधिककाळ त्यांच्या गीत आणि संगीताने कानसेनांना तृप्त केले आहे.

सुधीर विनायक फडके यांचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर शहरातील एका वकिली व्यवसाय करणा-या कुटुंबात झाला. गायन आणि वादनाचे सुरुवातीचे शिक्षण त्यांनी पं. वामनराव पाध्ये यांच्याकडून घेतले. त्यांच्या वडिलांच्या अचानक निधनाने त्यांना संगीताचे शिक्षण मध्येच सोडून पोटापाण्याच्या व्यवसायात लक्ष घालावे लागले.

कोल्हापूर सोडून मुंबईत आणि नंतर उत्तर भारतात दोन वर्षे दौरा करून त्यांनी मैफलींमध्ये सादरीकरण केले. यामुळे त्यांना वेगवेगळ्या प्रांतातील लोकसंगीताचा व कलांचा जवळून अभ्यास करता आला. त्याचा वापर सुधीर फडके यांनी आपले संगीत खुलविण्यासाठी केला. त्यामुळे अल्पावधीतच त्यांची एक नावाजलेला गायक व संगीतकार म्हणून ओळख झाली. सुधीर फडके यांनी सुमारे ११० चित्रपटांना संगीत दिले आहे. मराठी चित्रपटसृष्टीच्या जडण-घडणीत बाबूजींचे योगदान मोठे आहे. त्यांच्या काळातच मराठीने आपला सुवर्णकाळ अनुभवला. त्यांनी अनेक मराठी चित्रपटांना तर सुमारे २० हिंदी चित्रपटांना संगीत दिले. याशिवाय अनेक भावगीते, भक्तिगीते आणि मराठी लावण्यांना त्यांनी आपल्या मधुर संगीताने सजविले आहे. अनेक दिग्गज गायकांच्या स्वरांना त्यांनी आपल्या संगीताच्या कोंदणात बसविले आहे. बाल गंधर्व, पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा, लता मंगेशकर, आशा भोसले, मोहम्मद रफी आणि मन्नाडे ही त्यातील काही नावे.

महाराष्ट्राच्या घराघरात बाबूजी जाऊन पोचले ते मगदिमांफच्या गीत रामायणामुळे. या रामायणातील ५६ गीतांसाठी त्यांनी दिलेले संगीत आणि केलेले गायन एक वेगळाच प्रयोग आहे. त्यांनी गीत-रामायणाचे देश-विदेशात १८०० कार्यक्रम केले. आकाशवाणीवर सर्वाधिक लोकप्रियता मिळविलेला हा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम ठरला आहे.

चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रातही त्यांनी योगदान दिले आहे. स्वातंत्र्यलढ्यातील थोर सेनानी तात्याराव तथा विनायक दामोदर सावरकर यांच्यावरचा ङ्गवीर सावरकरफ चित्रपट बनविण्यासाठी त्यांनी कूपन्स विकून आणि कार्यक्रम करून निधी गोळा केला होता. फडके यांनी २१ हिंदी चित्रपटांसह १११ चित्रपटांना संगीत दिले. रुक्मणी स्वयंवर, वंदे मातरम, निरुपमा आणि परिराणी, दोस्त असा तर असा, शापित, चोराच्या मनात चांदणे, आधार, बाजीरावांचा बेटा, जावई विकत घेणे आहे, अनोळखी, कार्तिकी, या सुखानो या, जोतिबाचा नवस, आराम हराम आहे, आपले दात आपले ओठ, थोरली जाऊ, पुढचं पाऊल आणि धाकटी सून हे त्यांनी संगीत दिलेले काही चित्रपट आहेत.

संगीत दिग्दर्शनासोबतच सुधीर फडके यांनी नरवीर तानाजी, पोस्टातील मुली, आंधळा मागतो एक डोळा, जगाच्या पाठीवर, ते माझे घर, आम्ही जातो आमच्या गावा यांसारख्या चित्रपटांमध्ये गायन केले. त्यांनी ङ्गमराठा स्फूर्ती गीतफ हे भारतीय सैन्याच्या रेजिमेंट, मराठा लाईट इन्फंट्रीचे रेजिमेंटल गाणे तयार केले.

फडके यांना ङ्गहा माझा मार्ग एकलाफ, या मराठीतील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार (१९६३), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९१) आणि सह्याद्री स्वररत्न पुरस्कार (२००२) यांसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले. सुधीर फडके यांनी गोवा स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. ते अमेरिकेतील इंडिया हेरिटेज फाऊंडेशनचे संस्थापक सदस्यदेखील होते. अशा या ख्यातनाम संगीतकाराचे २९ जुलै २००२ रोजी मुंबईत निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ जुलै

१) श्रीम. निशा सखाराम साळुंखे कुरूळ, अलिबाग, २५-७-१९४८

२) श्री. अशोक विष्णू जोशी अलिबाग, २५-७-१९५३

३) श्री. रमेश शांताराम पाटील थळ, अलिबाग, २५-७-१९५९

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै.श्री दर्शन वसंत म्हात्रे, स्मरणार्थ बामणोली, अलिबाग**

## सुवर्णकण



भगवंताची एकांकिक भक्ती हीच जीवाच्या उद्धारासाठी एकमेव साधना आहे.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**



## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**| माणगाव | प्रतिनिधी |**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचलित अभिनव ज्ञानमंदिर उसरखुर्द विद्यालयात रविवार (दि.२०) जुलै दहावी बॅच २०११-१२ मधील माजी विद्यार्थी स्नेह मेळावा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यासाठी मुंबई, वाशी, बदलापूर इत्यादी ठिकाणावरून माजी विद्यार्थी आलेले होते. या विद्यार्थ्यांना अध्यापन करणारे शिक्षक अण्णासाहेब चिंधे, भरत काळे, अजित शेडगे, परमेश्वर खेडकर, मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, दीपक गुजर, विनोद लाड, सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचा माजी विद्यार्थ्यांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक दीपक गुजर यांनी केले तर स्वागतगीत, ईशस्तवन विनोद लाड यांनी सादर केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी व सर्व माजी विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न झाला.

# मुंबई किनारी मार्गावर सीसीटीव्हींची नजर

**| मुंबई| प्रतिनिधी |**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेने उभारलेला महत्त्वाकांक्षी प्रकल्प धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण) हा वाहतुकीसाठी टप्प्याटप्प्याने खुला करण्यात आला आहे. आता वाहनचालक व प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या मार्गावर ठिकठिकाणी २३६ सीसीटीव्ही कॅमेरे पालिकेने बसवले आहेत.**




या मार्गावर कोठेही अपघात झाला तर नियंत्रण कक्षाला त्याची त्वरित माहिती मिळते आणि अपघातग्रस्तांना तत्काळ मदत उपलब्ध होत आहे. दिवसभरात किती वाहनांनी या मार्गाचा वापर केला, त्या वाहनांचे प्रकार कोणते, किती वाहनांनी वेगाची मर्यादा ओलांडली, याचीही नोंद या कॅमेरा प्रणालीमुळे ठेवण्यात येत आहे. मुंबईकरांना जलद, सुलभ आणि सुरक्षित वाहतूक सुविधा उपलब्ध व्हावी, हा दीर्घकालीन दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई किनारी रस्ता प्रकल्प उभारला आहे.

शामलदास गांधी मार्ग उड्डाणपूल ते वरळी-वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाची लांबी १०.५८ किलोमीटर इतकी आहे. या प्रकल्पावर दोन्ही बाजूने वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण प्रकल्पावर ठिकठिकाणी विविध प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. शामलदास गांधी मार्ग ते वरळी वांद्रे सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत चार प्रकारचे वैशिष्ट्य असलेले, एकूण २३६ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित झाले आहेत.

### वाहन मोजणी

**वाहतूक सुरक्षेसाठी ७१ निगराणी कॅमेरे बसविले आहेत. हे कॅमेरे फिरवता, झुकवता व झूम करता येतात. जेव्हा एखादा अपघात होतो तेव्हा या कॅमेर्‍यामधील व्हीआयडीएस प्रणाली स्वयंचलित पद्धतीने सदर घटना ओळखते आणि आपोआप त्या घटनेकडे लक्ष केंद्रित करते. दोन्ही भूमिगत बोगद्यांमध्ये असे ७१ कॅमेरे बसविण्यात आले आहेत.**

दोन्ही बोगद्यांमधील आंतरमार्गिकांजवळ प्रत्येकी ५० मीटर अंतरावर अपघात ओळखणारे १५४ कॅमेरे बसविण्यात आले आहेत. अपघात, चुकीच्या दिशेने जाणारी वाहने इत्यादी घटनांची हे कॅमेरे आपोआप ओळख करतात. नियंत्रण कक्षाला तत्काळ सूचना देतात. या ठिकाणी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि अशी वाहने ओळखण्यासाठी सात कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वेग मर्यादा ओलांडणार्‍या वाहनांची छायाचित्रे व त्यांच्या वाहन क्रमांकाची नोंद हे कॅमेरे करतात.

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील भूमिगत बोगद्यांचे प्रवेशद्वार व निर्गमद्वारावर एकूण चार कॅमेरे बसविण्यात आले आहेत. भूमिगत बोगद्यांमध्ये जाणाऱ्या वाहनांची संख्या मोजणे, त्यांचे वर्गीकरण करणे, यासाठी हे कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

# शालेय मंत्रिमंडळ निवडणूक उत्साहात

**| महाड | वार्ताहर |**

महाड नगरपरिषद शाळा क्र. १ मध्ये शालेय मंत्रीमंडळ निवडणूक २०२५ शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांना लोकशाही निवडणूक प्रक्रियेचा थेट अनुभव यावा, यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या निवडणुकीत तीन उमेदवारांनी भाग घेतला होता. चुरशीच्या लढतीतून राजेंद्र बागडे या विद्यार्थ्याने बहुमताने विजय मिळवत शालेय मंत्रीपदाचा मान पटकावला. या निवडणूक प्रक्रियेत एकूण ७८ टक्के मतदान झाले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून भरत जाधव यांनी सर्व



कामकाज अत्यंत कुशलतेने पाहिले. मतदान अधिकारी म्हणून बहिरम, माळवदे, हाटे यांनी जबाबदारी पार पाडली, तर मतदान केंद्राध्यक्ष म्हणून मुख्याध्यापिका हाटे यांनी काम पाहिले. यावेळी विशेष अतिथी म्हणून महाड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर आणि नायब तहसीलदार सी. आर. पाटील यांनी विजयी उमेदवाराला पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले. मुख्याध्यापक जाधव यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत लोकशाहीचे मोल सांगितले. उपस्थित मान्यवरांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि शिस्तीचे कौतुक केले.

# बाल संत समागम उत्साहात

**| महाड | प्रतिनिधी |**

खरसई रायगड झोनस्तरीय निरंकारी बाल संत समागम महाड येथील श्री वीरेश्वर मंदिर सभागृह येथे रविवार (दि.२०) आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुलांना मार्गदर्शन करताना मुंबई येथील संत निरंकारी मिशनचे ब्रह्मज्ञान प्रचारक अनिल शिंदे बोलत होते.



विज्ञानाचा वाढता वापर लक्षात घेऊन मुलांचा अध्यात्मिक, मानसिक व बौद्धिक विकास व्हावा, यासाठी निरंकारी मिशनतर्फे वेबसाईटवर सुरू करण्यात आलेल्या व्हाईस डिवाइन बरोबरच मुलांसाठी कविता, चित्र रंगवा, विनोदी गोष्टी, शब्दकोडे, सामान्यज्ञान, प्रश्नमंजुषा इत्यादींचा समावेश आहे. त्याचाही मुलांनी अभ्यासाबरोबर लाभ घ्यावा असे त्यांनी मुलांना आवाहन केले. वरुण फडतरे, समीक्षा म्हात्रे यांनी उत्तम सूत्रसंचालन केले. यावेळी प्रकाश म्हात्रे, प्रवीण पाटील, सर्व सेक्टर संयोजक, मुखी, ब्रह्मज्ञान प्रचारक यांच्या मार्गदर्शनाखाली बाल संत समागम मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला.

# रोटरी क्लब अध्यक्षपदी अनिल ठकेकर

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचा नुकताच पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. रोटरी प्रांत श्री वन श्री वनचे नियोजित प्रांतपाल चारु श्रोत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.




यावेळी अनिल ठकेकर यांची क्लबच्या अध्यक्षपदी, तर अतिश थोरात यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर इतर पदाधिकाऱ्यांनीही आपापल्या पदाची सूत्रे स्वीकारली आहेत.

याप्रसंगी पदग्रहण सोहळ्याला माजी प्रांतपाल डॉक्टर गिरीश गुणे, रोटरी प्रांत श्री वन श्री वनचे फाऊंडेशन डायरेक्टर राजेश राऊत, सहाय्यक प्रांतपाल डॉक्टर स्वाती लिखिते यांच्यासह रोटरीचे सदस्य तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभिजात मराठी भाषा सप्ताहाचे आयोजन

**| मुंबई | प्रतिनिधी |**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला तो दिवस ३ ऑक्टोबर आता ङ्गअभिजात मराठी भाषा दिवसफ म्हणून साजरा केला जाणार आहे. त्याचबरोबर ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. अभिजात मराठी भाषा दिवस आणि अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये राज्यस्तरीय उपक्रम, बृहन्महाराष्ट्रस्तरीय उपक्रम आणि जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय उपक्रम राबविण्यात




येणार आहेत. मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षाची परपंरा गृहीत धरण्यात आली आहे. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरिता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबर दिवस 'अभिजात मराठी भाषा दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले आहे. यामध्ये अभिजात मराठी भाषेसंदर्भात तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, शिबिरांचे आयोजन करणे, ताम्रपट आणि शिलालेखांसह अभिजात मराठी ग्रंथांचे प्रदर्शन भरविणे, प्राचीन ग्रंथसंपदेचे समकालीन मराठीमध्ये अनुवाद केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्री करणे. अभिजात मराठी ग्रंथसंपदेचे डिजिटायझेशन करून त्यांची शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना ओळख करून देणे आदी गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांनी गिरवले आधुनिक शेतीचे धडे

**| चिपळूण | प्रतिनिधी |**

कात्रोळी कुंभारवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात सोमवार (दि. २१) जुलै रोजी आपला कृषिसखा परिवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषी कार्यशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी शेती आणि शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक मैलाचा दगड ठरलेल्या या कार्यशाळेत भात पिकावरील



कीड नियंत्रण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, नवीन पिकांची माहिती, मृदा परिक्षण, सिंचन व्यवस्थापन आणि विविध सरकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यशाळेतील प्रमुख विषय भात पिकावरील कीड नियंत्रण हा होता. रत्नागिरी जिल्ह्यासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भात पिक घेतले जाते. मात्र, सतत बदलणाऱ्या हवामानामुळे आणि नवीन कीटकांच्या प्रादुर्भावामुळे भात उत्पादकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. या बद्दल डॉ. मोहिते यांनी माहिती दिली. कार्यशाळेसाठी डॉ. निखिल चोरगे, डॉ. संकेत कदम, डॉ. शमिका चोरगे, प्रशांत इंगवले यांचे मार्गदर्शन लाभले.

# ग्रामपंचायतीतर्फे मोफत पाठ्यपुस्तके

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील रोठ बु. ग्रामपंचायतीच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके सेवा उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला जात आहे.



नितिन वारंगे यांनी २०२१ पासून या अभिनव उपक्रमास प्रारंभ करण्यात आला आहे. केवल ग्राम पंचायत हद्दीतील गरजू विद्यार्थी नव्हे तर तालुक्यातील विविध भागातील गरजू विद्यार्थ्यांना ही सेवा पुरविली जात आहे. दरवर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर जुनी पुस्तके गोळा केली जातात आणि गरजूंना ही पुस्तके वापरा आणि परत करा या शर्थीवर ही पुस्तक सेवा विनामूल्य पुरविली जात आहे. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये या उद्देशाने ग्राम पंचायतीच्या वतीने सर्व सदस्य व कर्मचारी वर्ग यांच्या सहकार्यातून ही मोफत पाठ्यपुस्तके सेवा सुरू करण्यात आली आहे असे वारंगे यांनी सांगितले.

# संत नामदेव महाराज संजीवनी समाधी सोहळा साजरा

**| बोर्लीपंचतन | वार्ताहर |**

बोर्लीपंचतन पंचक्रौशीतिल नामदेव शिंपी समाजाच्या वतीने ६७५ वा संजीवनी समाधी सोहळा समाज महीला बंदु आणि भगीनिच्या वतीने संपन्न झाला



यावेळी पूजा आरती आणि नामस्मरण, किर्तन करण्यात आले तर नामदेव चरीत्र ग्रंथाचे पारायण वाचन सुरेश मुद्राळे, अशोक मुद्राळे यांनी वाचन केले

समाजाचे अध्यक्ष दत्तात्रेय पांढरकामे यांची रायगड जिल्हा नामदेव शिंपी समाज अध्यक्ष म्हणून जिल्ह्यातून निवड करण्यात आली, तर दत्तात्रेय मुद्रा यांची श्रीवर्धन तालुका अध्यक्ष म्हणुन निवड करण्यात आली तर श्रीवर्धन पंचायत समिती शिक्षण विभाग प्रभारी विस्तार अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संजीवनीसमाधी सोहळ्याचे औचित्य साधुन तिघांना ही श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन सन्मानपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.



# आंबेवाडी चारसूत्री पद्धतीने भात लागवड

**| कोलाड | प्रतिनिधी |**

आंबेवाडीनाका कोलाड येथे शेतकरी चंद्रकांत लोखंडे यांनी आपल्या शेतात चारसूत्री पध्दतीने भात लावणी केली. दरम्यान कृषी सहायक अधिकारी अनिकेत ननावरे व अफसर ईनामदार कृषी सहायक अधिकाऱ्यांनी कृतीतून माहिती दिली.

यावेळी देवीदास लोखंडे, चैतन्य लोखंडे, दिनेश खराडे, दिनेश लोखंडे, अनंत बाईत, विठोबा महाबळे, सुधीर सानप, शैलेश पवार, अंकुश पवार, यशवंत ठोंबरे, रामदास कापरे, बच्चन वाघमारे, अथर्व जयेश मोरे, ओंकार करावडे यांनी सहभाग घेतला होता.

### जलप्रदूषण टाळण्याचा प्रयत्न | भारतीय संस्कृतीचे जतन

# पर्यावरणपूरक गणेशमूर्तीवर भर

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

**यंदाच्या गणेशोत्सोवात पर्यावरणाची कास धरणारे आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणारे एक आगळे-वेगळे पाऊल रत्नागिरी तालुक्यातील हरचेरी येथील गो-प्रेमी गणेशमूर्ती कारागीर कुटुंबाने उचलले आहे.**

यंदाच्या गणेशोत्सवात 'गव्य गणेशाची' स्थापना करून गायीचे शेण तसेच शेतातील मातीपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती घरोघरी पोहोचवण्याचा आणि त्या माध्यमातून देशी गायीला घरोघरी नेण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. यामुळे एकीकडे पर्यावरणाची काळजी घेतली जाईल, तर दुसरीकडे देशी गाईचे महत्त्व आणि तिचे विविध उपयोग जनसामान्यांपर्यंत पोहोचवता येतील, अशी त्या मागची धारणा आहे. गायीच्या शेणापासून बनवलेल्या गणेशमूर्ती या पूर्णपणे नैसर्गिक आणि पवित्र असतात आणि त्या पाण्यात सहज विरघळतात. यामुळे जलप्रदूषण टाळता येते. विसर्जनानंतर या मूर्तींचे मिश्रण खत म्हणून शेतीत वापरता येते, ज्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. या वर्षीच्या गणेशोत्सवासाठी शेणापासून मूर्ती घडवलेल्या दीपाली प्रणित याचे कुटुंबीय तालुक्यातील हरचेरी गावात देशी गाईंचे गोवसंर्धन केंद्र चालवते..देशी गायीचे शेण तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध होणारी शेतातील माती वापरून केलेल्या मूर्तींच्या निर्मितीमुळे ग्रामीण भागातील कारागिरांना आणि गो-शाळांना रोजगार उपलब्ध होतो आहे. ङ्गगव्य गणेशाफ्च्या स्थापनेसोबतच, देशी गाईचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा आणि प्रत्येक घरात देशी गाय असावी, असा एक मोठा संकल्प या गणेशोत्सवात करण्यात येत आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गाईला मातेसमान मानले जाते आणि तिचे अनेक फायदे आहेत. देशी गाय केवळ दूध देत नाही, तर ती अनेक प्रकारे मानवासाठी उपयुक्त आहे. तिचे पंचगव्य आयुर्वेदात औषधी गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे. देशी गाईचे दूध आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. ते पचायला हलके असते आणि अनेक रोगांवर उपकारक ठरते. गाईचे शेण (गोमय) हे उत्तम नैसर्गिक खत आहे. याच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता वाढते आणि रासायनिक खतांचा वापर टाळता येतो, ज्यामुळे नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन मिळते. शेणाचा वापर करून बायोगॅस तयार करता येतो, ज्यामुळे घरासाठी ऊर्जा मिळते आणि इंधनाचा खर्च वाचतो. गोमूत्र आणि शेण अनेक आयुर्वेदिक औषधांमध्ये वापरले जाते. अनेक गंभीर रोगांवर उपचारासाठी त्यांचा वापर केला जातो. गाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत करते. तिचे शेण आणि गोमूत्र जमिनीची गुणवत्ता सुधारते आणि परिसंस्थेला समृद्ध करते. देशी गोपालन हा ग्रामीण भागातील लोकांसाठी उत्पन्नाचा चांगला स्रोत ठरू शकतो, ज्यामुळे त्यांचे आर्थिक सक्षमीकरणही होते.

### पर्यावरणपूरक 'गव्य गणेश' काळाची गरज

**गेल्या काही वर्षांपासून प्लास्टर ऑफ पॅरिसपासून बनवलेल्या गणेशमूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण ही एक मोठी समस्या बनली आहे. पीओपीच्या मूर्ती पाण्यात विरघळत नाहीत. त्यामुळे नद्या, तलाव आणि समुद्रातील जीवसृष्टीला मोठा धोका निर्माण होतो. यावर एक उत्तम पर्याय म्हणून गायीच्या शेणापासून तयार केलेल्या गणेशमूर्तींचा वापर करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकणार आहे.**

# ललित मोरे यांचे निधन



**उरण** : शहरातील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते ललित रघुनाथ मोरे यांचे अल्पशा आजाराने शनिवार (दि.१९)जुलै रोजी निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ७५ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुलगे, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. मोरे यांचे पुण्यनुमोदन व श्रद्धांजली कार्यक्रम रविवार (दि. २७) जुलै सकाळी ११.३० वाजता त्यांच्या मुळगावी मु. पो. तालुका महाड येथे होणार आहेत.

# निवडक



## इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदी शिल्पा दगडे

**कर्जत :** इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या नवीन २०२५-२६ वर्षाकरीता पदग्रहण सोहळा नुकताच संपन्न झाला. क्लबच्या अध्यक्षपदी शिल्पा विजय दगडे यांची निवड करण्यात आली. या कार्यक्रमांचे आयोजन रॉयल गार्डनच्या सीबीसी सभागृहामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला होता. यावेळी व्प्रमुख पाहुण्या डॉ. माधवी ठाकूरदेसाई उपस्थित होत्या. सरस्वती चौधरी यांनी मागील वर्षाचा अहवाल सादर केला, त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून शिल्पा दगडे, उपाध्यक्षा मोनिका बडेकर, सचिव कश्यपी ठक्कर, खजिनदार वैशाली मुसळे, उज्वला पाटील, ॲड. संजीवनी घुमरे, सरस्वती चौधरी यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी अवंतिका गायकर, उत्तरा वैद्य, पल्लवी सावंत, प्राची चौडिया, मनीषा साबणे, शीतल पाटील, साक्षी अडसूळ, करुणा पराडकर, ज्योत्स्ना शिंदे, रूपा खणाळ तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## उरणमध्ये कायदेविषयक जनजागृती

**उरण :** उरण तालुक्यातील शिक्षण प्रसारक कै. गोपाळ नारायण अक्षीकर विद्या संकुल, उरण येथे मंगळवार (दि.२२) जुलै रोजी कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न झाले. या शिबिराचे आयोजन दिवाणी न्यायालय क.स्तर, उरण व तालुका विधी सेवा समिती, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाला एम. एस. काझी (दिवाणी न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष), एस. पी. वानखडे, जी. के. आर. टंडन हे सह-दिवाणी न्यायाधीश, तसेच वकिल संघटनेचे अध्यक्ष ॲड. व्ही. एल. पाटील व नामवंत वकील मंडळी, न्यायालयीन कर्मचारी, गट विकास अधिकारी सर्जेराव पाटील, आणि शाळेतील शेकडो विद्यार्थी मोठ्या उत्साहात सहभागी झाले. या शिबिरात प्रमुख वक्ते एम. एस. काझी यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अमर पाटील यांनी केले. ॲड. संघश्री गायकवाड यांनी कार्यक्रमाचा समारोप ॲड. अमर पाटील यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.

## तोतया पोलिसांचा सुळसुळाट

**पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करून ज्येष्ठ नागरिकांना लुबाडणाऱ्या भामट्यांनी एका दिवसामध्ये पनवेल व खारघर या भागातील दोन ज्येष्ठ नागरिकांजवळचे तब्बल लाखो रुपये किमतीचे दागिने लुबाडल्याचे उघडकीस आले आहे. या तोतया पोलिसांविरोधात पनवेल शहर, खारघर पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. पनवेलच्या बावन बंगलो येथे राहणारे नरेश मिराई (७३) हे फेरफटका मारण्यासाठी गेले होते. यावेळी दोघा भामट्यांनी सीआयडी अधिकारी असल्याचे भासवून बाहेर भुरटे चोर फिरत असल्याचे सांगून घाबरवत अंगावरील दागिने काढून ठेवण्यास सांगितले. मिराई यांनी सोन्याची चेन तसेच दोन अंगठ्या काढल्यानंतर हे दागिने त्यांच्या खिशात ठेवण्याचा बहाणा करून दागिने काढून घेत ते दुचाकीवरून पसार झाले. तर दुसऱ्या घटनेत सातारा येथे राहणारे विश्वनाथ कदम (७८) हे खारघर येथे राहणाऱ्या मुलाकडे काही दिवसांपूर्वीच आले होते. ते घराबाहेर फिरायला गेले होते. ते खारघर सेक्टर-७ मधील जीएसटी कॉलनी रोडने पायी चालत जात असताना, तिघा भामट्यांनी पोलीस असल्याचे भासवून त्या भागात चोऱ्यामाऱ्या होत असल्याचे सांगून त्यांना अंगावरील दागिने काढण्यास सांगून त्यांनी हातातील सोन्याची अंगठी काढली असता, तोतया पोलिसांनी हातचलाखी करून त्यांची अंगठी चोरून पलायन केले.

## अंजुमन इस्लाम महाविद्यालयात स्वच्छता जनजागृती

**कोर्लई :** मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड जंजिरा येथे स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण २०२५ या मोहिमेअंतर्गत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती मुरुड व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे डॉ. साजिद एफ. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. तालुका पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी मंगेश पाटील, संजय वानखेडे, श्रेया गद्रे, अविनाश पाटील हे उपस्थित होते. स्वच्छतेच्या महत्त्वावर भर देत ग्रामीण भागातील नागरिकांनी स्वच्छतेसाठी सजग राहण्याचे आवाहन केले या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. फिरोज शेख, प्रा.अल्ताफ फकीर, प्रा. जावेद खान, प्रा. शोएब खान, अंजुम दाखवे यांनी केले. हुमेरा घार, अज्बा चापेकर, आयशा देशमुख, सफा हम्दुले व इतर सर्व विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला होता.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- गोंधळपाडा येथील गृहप्रकल्पाकरीता अनुभवी सिव्हील इंजिनिअर/साईट सुपरवाइजर पाहिजेत. संपर्क- ९५९५०४१६१२/८१८०८६१२३४
- अंध दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या GSP INDIA या संस्थेला अलिबागमध्ये पद भरणे आहे. प्रकल्प समन्वयक शिक्षण पदवीधर/MSW मानधन (१२००० ते १५००० पात्रतेनुसार) सामाजिक संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. आपला बायोडाटा ९०९६२१४२९४ या क्रमांकावर पाठवा. www.gspindia.org
- शर्ट कारागीर पाहिजे. नामांकित टेलरिंग दुकानात अनुभवी शर्ट कारागीर पाहिजे. संपर्क हिमसन टेलर, पेढांबे, अलिबाग मो. ९२६००९८९९२
- ऑफिसमध्ये अकाऊंटचा कामासाठी मुलगी पाहिजे. महाराष्ट्र जनरल स्टोअर्स अलिबाग ९७६५०५०२६३
- दुकान गाळा विक्री करणे आहे. अलिबाग एसटीस्टँडजवळ ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# शेतकरी आधुनिकतेच्या वाटेवर

## अडीच वर्षात ४७९ अवजारांची खरेदी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भात व इतर पिकांच्या लागवडीसह शेतीच्या कामांसाठी आता आधूनिक अवजारांचा वापर केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी आधुनिक शेती करण्याकडे वळत असल्याचे चित्र दिसत आहे. जिल्ह्यात गेल्या अडीच वर्षामध्ये ४७९ नवीन अवजारे खरेदी केली आहेत. या अवजारांच्या माध्यमातून शेतकरी आधुनिकतेची कास धरत असल्याचे दिसून येत आहे.

जिल्ह्यामध्ये ९० टक्के शेतकरी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेती करतात. भात शेती करण्यावर शेतकरी अधिक भर देतात. जून ते सप्टेंबरमध्ये पडणाऱ्या पावसावर शेतकरी शेती अधिक करतात. त्यात पारंपारिक पध्दतीने शेती केली जाते. राष्ट्रीय कृषी विकास योजना व अन्य कृषी विभागाच्या योजनांमार्फत शेतकऱ्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न कृषी विभागाने जिल्ह्यात केला. कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजना शेतकऱ्यांपर्यंत कशा पोहचतील याकडे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी लक्ष दिले. विशेष म्हणजे कृषी सहाय्यक व कृषी पर्यवेक्षकांनी थेट गावांमधील शेतकऱ्यांसोबत संपर्क साधून त्यांना आधुनिक शेतीकडे वळण्यास प्रोत्साहीत केले. प्रात्यक्षिकांद्वारे त्याची माहितीदेखील देण्याचे काम केले. त्यात लॉकडाऊनमध्ये बेकारीचे संकट कोसळल्याने मुंबई, पुणेकडे वळणारे गावांतील तरुणांनी भातशेतीसह भाजीपाला व अन्य पिकांची लागवड करण्यास सुरुवात केली. कृषी विभागाच्या वेगवेगळ्या योजनांमधून मिळणारे आधुनिक यंत्र खरेदी केली. त्यात ट्रॅक्टर, क्रेशर, पॉवर टिलर, ग्रास कटर, स्पे पंप, नांगर, मिनी ट्रॅक्टर, भात मळणी यंत्र, मिनी डाल मिल अशा ४७९ यंत्राचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक यंत्रामार्फत शेती करण्यावर भर दिला.



**आधुनिक अवजारांवर दृष्टीक्षेप**

| वर्षे | अवजारांची संख्या |
| --- | --- |
| २०२३- २०२४ | २५१ |
| २०२४- २०२५ | १५८ |
| २०२५- २०२६ आतापर्यंत | ७० |

जिल्ह्यात गेल्या दोन वर्षात पारंपारिक अवजारांपेक्षा आधुनिक यंत्राद्वारे शेती करण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे पारंपारीक अवजारे आता कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे. पारंपारिक अवजारांचा वापर कमी केला जात आहे. आधुनिक अवजारांमुळे शेतकऱ्यांचा वेळ व पैशाची बचत होत असल्याचे दिसत आहे. अपुऱ्या मनुष्य बळाचा प्रश्नही सुटण्याच्या वाटेवर आहे.

पूर्वी भात लावणीच्यावेळी नांगरणीसाठी पारंपारिक नांगरामार्फत मशागत करावी लागत होती. त्यामुळे पुर्ण दिवस जात होता.

आता आधुनिक यंत्रामार्फत नांगरणीचे काम केले जात आहे. यंत्रामुळे एका दिवसाचे काम, एका तासात होऊ लागला आहे. सातशे रुपयांत दिवसभराचे काम होऊ लागल्याने पैशाची व वेळेची बचत होऊ लागली आहे. शेतीच्या वेगवेगळ्या कामांसाठी मजूर मिळत नसल्याची समस्या कायमच आहे. त्यामुळे मजूरकरांचे काम आधुनिक यंत्र करीत असल्याचे चित्र आहे.

> जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ व्हावी. त्यांना आर्थिक बळ मिळावे, यासाठी आधुनिक यंत्रामार्फत शेतीची कामे करण्यावर शेतकऱ्यांनी भर देणे गरजेचे आहे. बदलत्या हवामानाबरोबरच पिक परिस्थितीनुसार यांत्रिकीकरण महत्वाचा भाग आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आधुनिक यंत्राकडे वळणे गरजेचे आहे.
>
> -प्रवीण थिगळे
> उपसंचालक कृषी विभाग,

## मंदिरात चोरी करणारा गजाआड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरातील तक्कागाव येथील श्री साईबाबा मंदिर तसेच चिंचपाडा येथील विठ्ठल मंदिरात चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. तक्कागाव येथील श्री साईबाबा मंदिर येथे चोरी करून सात हजार रुपये रोख रक्कम तसेच विठ्ठल मंदिरात चोरी करून तेथील समई व घंटा असा मिळून ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रवीण फडतरे, पोहवा तुषार बोरसे, पोहवा संदेश म्हात्रे, पोहवा महेश पाटील यांनी तांत्रिक तपास व गुप्त बातमीद्वारा आरोपी राहुल मोरे याला ताब्यात घेतले असता त्यांनी दोन्ही गुन्ह्याची कबुली दिली आहे. याबाबत पुढील तपास पोहवा पवार करीत आहेत.



गणेशोत्सव एक महिन्यावर आल्याने गणपती कारखान्यात गणेशमूर्ती रंगकाम करण्यात मुर्तीकार व्यस्त दिसत आहेत. (छाया : समीर मालोदे)

## कर्जत पोलिसांना १०० बॅरिगेट्सचे वाटप

### डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे सामाजिक बांधिलकी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे कर्जत पोलीस ठाण्याला १०० बॅरीगेट्सचे वाटप करण्यात आले. श्री विठ्ठल मंदिर दहिवली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदिप भोसले, नगरपरिषद मुख्याधिकारी तानाजी चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहूल वरोटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे उपस्थितीत हे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात प्रतिष्ठानच्या वतीने भगवान भोसले, श्रीधर बुंधाटे, अशोक भागीत व शंकर देशमुख याचे हस्ते पाहुण्याचा सत्कार करण्यात आला.विकास चित्ते यांनी प्रास्ताविकात डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांचे माध्यमातून होणाऱ्या सामाजिक व पर्यावरण पुरक कामांची माहिती दिली.

पोलीस निरीक्षक संदिप भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शनिवार, रविवारी होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या बॅरिकेटची खुप मदत होईल व वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी प्रतिष्ठाने खुप मोठी मदत केल्याने त्यांनी प्रतिष्ठानचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास चित्ते व आभार प्रदर्शन खडे गुरुजी यांनी केले.



## गोंधळपाडा शाळेत दीपपूजा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

दीप अमावस्या हा हिंदू संस्कृतीतील एक महत्त्वाचा सण आहे, जो आषाढ महिन्यातील अमावस्येला साजरा केला जातो. या दिवशी घरात दीप प्रज्वलित करून सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धीचे स्वागत केले जाते. जी धार्मिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्वाची मानली जाते. त्याचाच एक भाग म्हणून राजिप शाळा गोंधळपाडा गुरवार (दि. २४) जुलै रोजी विद्यार्थ्यांना या सणाची आणि संस्कृतीची माहिती व्हावी याकरिता शाळेत दीपपूजा तसेच मुलांना आजच्या दिवसाचे महत्व सांगण्यात आले. शिक्षणा बरोबर सण आणि संस्कृती जपावी हे मूल्य मुलांमध्ये रुजवण्यासाठी हा उपक्रम साजरा करण्यात आला.

## उरण महाविद्यालयात कार्यशाळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

कोंकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती यांच्या अंतर्गत प्रथम वर्ष वाणिज्य, कला, वाणिज्य ह्या विद्यार्थ्यांकरिता तसेच पालकांकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम उपस्थितांचे परिचय व स्वागत प्रा. डॉ. ए. के. गायकवाड यांनी केले.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील विविध उद्दिष्टे आणि प्रामुख्याने क्रेडिट स्ट्रक्चरच्या माध्यमातून आपली पदवी, पदव्युत्तर शिक्षण कसे पूर्ण करावे याचे मार्गदर्शन नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समितीचे प्रमुख प्रा. डॉ. पी आर कारूळकर यांनी सांगितले.

नवीन शैक्षणिक धोरणामधील परीक्षेचे स्वरूप कसे आहे या बद्दल डॉ. एम.जी. लोणे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रा. व्हि. एस. इंदुलकर प्रा. डॉ. ए. के. गायकवाड, प्रा. आर. टी. ठवरे, डॉ. ए आर. कांबळे, डॉ. डी. पी हिंगमिरे, आर. पी. पठाण आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी मानले.

## पाली शहरात अनेक ठिकाणी अवैध पार्किंग

**। सुधागड-पाली, प्रतिनिधी**

पाली शहरामध्ये गेल्या अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडी व अवैध पार्किंग ही मोठी समस्या असून, नगरपंचायत व पोलीस प्रशासन या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र सध्या उभे राहत आहे. अष्टविनायक गणपती देवस्थान असलेल्या पाली शहरात गणपती मंदिराच्या बाहेरील भाग वगळता पार्किंगसाठी कोणतीही ठोस व्यवस्था नासल्यामुळे वाहतूक अडथळ्यांची समस्या अधिकच तीव्र होत चालली आहे.

हटाळेश्वर चौक, बाजारपेठ परिसरात अवैधपणे उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे दुकानदार व पादचाऱ्यांना रोजचाच त्रास सहन करावा लागतो. दुकानदारांची ग्राहकांशी किंवा वाहनचालकांशी होणारी भांडणे हे आता रोजचे चित्र बनले आहे. पावसाळ्यात तर रस्त्यावर चालणेही कठीण झाले असून, नागरिकांना जीव मुठीत धरून वाहतूक अडथळे पार करावे लागतात.



वर्षभरापूर्वी पोलिसांनी अवैध पार्किंगवर काही प्रमाणात कारवाई केली होती, मात्र ती अल्पकालीन ठरली. आजही बाजारतळे ते गांधी चौक दरम्यानच्या रस्त्यावर असंख्य दुचाकी व चारचाकी वाहनं रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभी राहतात, परिणामी रस्ता पूर्णपणे अडवला जातो. यामुळे सामान्य वाहनचालकांना देखील तीव्र वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.

पाली शहराच्या गर्दीच्या ठिकाणी वाहतूक पोलीस हजर नसल्यामुळे परिस्थिती बिघडत चालली आहे.

अनेक वेळा स्थानिक वृत्तपत्रांतूनही या विषयावर बातम्या प्रसिद्ध झाल्या असून कारवाईची मागणी होत आहे. मात्र कारवाई केली जाते तेवढ्यापुरती; दुसऱ्याच दिवशी पूर्वीचीच स्थिती पुन्हा दिसून येते. नागरिकांनी पुन्हा एकदा नगरपंचायत प्रशासन व पोलीस यंत्रणेकडून ठोस उपाययोजनेची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा | फसवणूक केल्यास पाच वर्ष काळ्या यादीत टाकणार

## पीकविमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

**श्रीवर्धन तालुक्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा अर्ज भरण्यासाठी सामान्य सुविधा केंद्र विभागास प्रति शेतकरी चाळीस रुपये मानधन केंद्र शासनाने निर्धारित करुन दिले असून, शेतकऱ्यांनी विमा हप्ता व्यतिरिक्त इतर शुल्क अदा करू नये, असे आवाहन श्रीवर्धन तालुका कृषि अधिकारी सुनील जाधव यांनी केले आहे. विमा हप्ता भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ असून सर्व शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे,असे सांगितले आहे.**

रायगड जिल्ह्यांत पीकविमा योजना भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे.खरीप हंगामातील भात (धान), नाचणी (रागी), या अधिसूचित पिकांसाठी अधिसूचित क्षेत्रातील शेतकऱ्यांना भाग घेता येईल. अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित पिके घेतलेले सर्व शेतकरी या योजनेत भाग घेऊ शकतात. योजनेत सहभागी होण्यासाठी ग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७-१२ उतारा, आधार संलग्न बँक पासबुक, आधार कार्ड आणि पीक पेरणीचे स्वयं घोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज भरून सहभागी व्हावे. याशिवाय सामान्य सुविधा केंद्र, आपले सरकार सुविधा केंद्र येथे किंवा https://pmfby.gov.in या पोर्टल वरुन ही अर्ज भरता येईल. ई-पीक पाहणी, विमा घेतलेले पीक यात तफावत आढळल्यास विमा अर्ज रद्द होईल, भरलेला विमा हप्ता जप्त होतो. एखाद्या अर्जदाराने बोगस किंवा फसवणूक करून विमा योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना पुढील किमान पाच वर्षे काळ्या यादीत टाकून शासनाच्या कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही.



ह्या योजनेत सर्व पिकांसाठी जोखीम स्तर ७० टक्के आहे. विमा संरक्षणासाठी रायगड जिल्ह्यासाठी भारतीय कृषी विमा कंपनी या विमा कंपनीची निवड झाली आहे. विमा संरक्षित रक्कम भात पिकासाठी हेक्टरी ६१००० असून विमा हफ्ता रक्कम ४५७ प्रति हेक्टरी आहे तसेच नाचणी पिकासाठी विमा संरक्षित रक्कम हेक्टरी ४०,००० असून विमा हफ्ता रक्कम १०० प्रति हेक्टरी आहे.

अधिक माहितीसाठी केंद्र शासनाचे कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन क्रमांक १४४४७ यावर संपर्क करावा, अथवा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, श्रीवर्धन येथे संपर्क साधावा, असे आवाहन श्रीवर्धन तालुका कृषी अधिकारी यांनी केले आहे.

**नुकसान भरपाई मिळणार**

पीक पेरणी पासून काढणीपर्यंतच्या कालावधीत मविविध नैसर्गिक घटक, कीड व रोगांचा प्रादुर्भाव इत्यादी कारणांमुळे पिक कापणी प्रयोगाद्वारे येणारे सरासरी उत्पादन हे त्या महसूल मंडळ साठीच्या उंबरठा उत्पादना पेक्षा कमी आल्यास त्या महसूल मंडळ मधील त्या पिकाचा विमा घेतलेल्या सर्व शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई अदा केली जाईल.

# उरणच्या महिला कृषी अधिकारी भात लागवडीत मग्न

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यात जवळ-जवळ ६० ते ७० टक्के भाताची लागवड ही चारसुत्री पद्धतीने करण्यात आली असून तालुका कृषी अधिकाऱ्यांनी चारसुत्री लागवडीच्या पद्धतीवर भर दिला आहे. कृषी अधिकारी हे शेतकऱ्यांबरोबर तालुक्यातील गावागावात चार सूत्रीच्या लागवडीसाठी जात असून, या लागवडीच्या पद्धतीचे अनुभव व महत्त्व शेतकऱ्यांना पटवून देत आहेत. त्यामुळे शेतकरीही कमी खर्चात आणि जास्त उत्पादन देणाऱ्या या चारसुत्री लागवडीच्या पद्धतीला प्राधान्य देत आहेत. दरम्यान चाणजे ता. उरण येथील प्रगतशील महिला शेतकरी भारती उमेश म्हात्रे यांच्या शेतात तसेच मोठीजुई येथील पोलीस पाटील तथा शेतकरी शांताराम भोईर यांच्या शेतात सोमवारी व बुधवारी उरण तालुका कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी चारसुत्री पद्धतीने लागवड केली.

## माधवी धारिया यांची जिल्हा समितीवर सदस्यपदी निवड

**पोलादपूर :** कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार समिती गठण अहवाल प्रत देण्याबाबत तसेच समिती सदस्यपदी पोलादपूर येथील वकील माधवी धारिया यांची निवड झाल्याचे अधिकृत शासकीय पत्र रायगड जिल्हाधिकारी व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातून त्यांना प्राप्त झाले आहे. जिल्हा स्तरावर स्थानिक तक्रार समिती जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार सदर समितीचे अध्यक्ष म्हणुन डॉ. निहा राऊत यांची निवड करण्यात आली आहे. या अधिनियमातील तरतुदीप्रमाणे ॲड. माधवी धारिया यांनी सदस्यपदावरून कामकाज करण्यासाठी ही नियुक्ती परिपत्रकानुसार करण्यात आली आहे. समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल ॲड. माधवी धारिया यांचे रायगड जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुहिता ओव्हाळ आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी अभिनंदन केले आहे. तालुक्यातील शिक्षण, कला, सामाजिक तसेच महिला सक्षमीकरण क्षेत्रात ॲड. माधवी धारिया यांनी आपल्या कार्यक्षमतेने नावलौकिक केला आहे.

### आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग, जि. रायगड.

-: २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-
(फक्त सभासदांसाठी)

सप्रेम नमस्कार,

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अलिबाग या संस्थेच्या सभासदांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. ०२ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता क्षात्रैक्य चौकळशी माळी समाज सभागृह, कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड** या ठिकाणी खालील विषयांचा विचार करण्या करीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ (अ) मधील तरतुदीनुसार सर्व सभासदांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे बंधनकारक असल्याने सर्व सभासदांसाठी वार्षिक सभा सुरू होण्यापूर्वी याच ठिकाणी दुपारी ३ ते ४ या वेळेत प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे, तरी सर्व सभासदांनी दुपारी ३ वाजता सभेच्या ठिकाणी उपस्थित रहावे, प्रशिक्षणा नंतर ठिक ४.०० वाजता सभेला सुरूवात होईल.

**-: सभेपुढील विषय :-**

१. मागील दि. १० ऑगस्ट २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभा इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२५ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
४. सन २०२५-२६ या सालाकरिता अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२४-२५ या सालाकरिता तयार केलेल्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
५. सन २०२४-२५ या सालाचा वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे व स्विकृत करणे.
६. सन २०२५-२६ या सालाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीस व वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे
७. मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल सादर करणे व त्यास मंजूरी देणे.
८. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरूस्तीस मंजूरी देणे.
१०. प्रशिक्षण/कर्ज/गुंतवणूक/वसूली इत्यादी तत्सम विषयांच्या आर्थिक धोरणांना मान्यता देणे.
११. संस्थेच्या रामराज शाखेसाठी खरेदी करण्यांत आलेल्या एन.ए. प्लॉट वर बांधकाम करण्यास मंजूरी देणे.
१२. संस्थेच्या पिंपळभाट व पोयनाड शाखेसाठी जागा खरेदी करणेस मंजूरी देणे.
१३. नियम ४९ नूसार निर्लेखन कर्जास मान्यता देणे.
१४. सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पुणे या संस्थेचे आदर्श पतसंस्थेमध्ये विलिनीकरण करणे बाबत, आलेल्या प्रस्तावावर विचार करून मंजूरी देणे.
१५. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ :- अलिबाग
दिनांक :- १७/०७/२०२५

**मा.संचालक मंडळाच्या अनुज्ञेने**
**(सौ. मीनाक्षी शामसुंदर पाटील )**
**कार्यलक्षी संचालिका**
**आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग**

**-: सूचना :-**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्धा तास उशिरा म्हणजेच सायं. ४.३० वाजता घेतली जाईल व या सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. ज्या सभासदांनी अजूनही आपले मोबाईल क्रमांक संस्थेकडे नोंदविले नाहीत किंवा ज्यांचे मोबाईल नंबर बदलले आहेत अशा सभासदांनी कृपया संस्थेच्या जवळच्या शाखेमध्ये संपर्क करून आपले मोबाईल नंबर अपडेट करणे व आपली केवायसी अपडेट करण्यास विनंती.
३. सन्माननीय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान आठ दिवस अगोदर पाठवाव्यात.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### शुद्धीपत्रक

दि.१७-०७-२०२५ रोजी पान क्र.२ वर आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अलिबाग यांची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये सभेचे ठिकाण पी.एन.पी.नाट्यगृह अलिबाग असे टाकण्यात आले होते. तरी ते सभेचे ठिकाण नसून ते क्षात्रैक्य चौकळशी माळी समाज सभागृह, कुरुळ असे वाचण्यात यावे.

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी यांच्या वतीने, खालील कामासाठी अनुभवी कंत्राटदारांकडून आयआरइपीएस पोर्टलवर ई- निविदेच्या स्वरुपात सिंगल पॅकेट बोली प्रणाली खुली निविदा मागविण्यात येत आहे. **कामाचे नाव :** महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील एसएसइ/ डब्ल्यू/एमएनआय उपविभागा अंतर्गत वीइआर स्थानकातील फलाट क्रमांक -1 च्या पृष्ठभागाची दुरुस्ती. निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डीवायसीइडब्ल्यू /आरपीएफ1/2025/23, दिनांक 25/07/2025. एकूण अंदाजित खर्च : ₹ 14,61,721.96 (जीएसटी वगळून). ऑनलाईन प्रस्ताव/बोली सादर करण्यासाठी बोलीच्या आरम्भाची तारीख : 01/08/2025, बोलीच्या समाप्तीची तारीख/ वेळ : 18/08/2025 रोजी 15:00 वाजेपर्यंत. पूर्णत्वाचा कालावधी : 6 महिने पावसाळा वगळून. मॅन्यूअल ऑफर स्विकारली जाणार नाही. कृपया तपशिल/ सहभागासाठी : https://www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी / शुद्धिपत्र/ पुरकपत्र केवळ या वेबसाईट वर देण्यात येतील.

### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा

**निविदा अधिसूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी IREPS पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे: **कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील रत्नागिरी विभागातील चिपळूण स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक 1 व 2 साठी टॅक्टाइल फ्लोअरिंग दुरुस्तीचे काम. निविदा सूचना क्रमांक: केआर/आरएन/डिव्हायसीईडब्ल्यू/पीएव्हीइआर/2025/17 दिनांक: 25/07/2025 एकूण अंदाजित खर्च: ₹8,33,671.37 (GST वगळून) निविदा सुरू होण्याची तारीख: 01/08/2025 निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: 18/08/2025 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील काम पूर्ण करण्याची मुदत: मॉन्सूनचा समावेश करून 6 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

### जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रदीप प्रभाकर गावंड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-नारंगी, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ४९/२, एकूण क्षेत्र ००-१९-५० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै.०.५८/-.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- /०७/२०२५

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### तहसील कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र.फौजदारी/कात-९/आवक क्र. ३१३/२०२५

श्री. अंकुश वसंत शिंदे
रा.भोईआळी, पाली — वादी
ता.सुधागड, जि. रायगड
ग्रामसेवक, नगरपंचायत-पाली — प्रतिवादी
ता.सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्यूबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री. अंकुश वसंत शिंदे रा. भोईआळी, पाली ता. सुधागड, जि. रायगड येथे माझा जन्म दि. २३-०८-१९७२ रोजी मौजे-पाली, ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यंत नगरपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यू नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसील कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदरहु माझ्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसील कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यू नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- २३-०७-२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**



# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री. उल्हास शंकर राऊत रा. मु. स्वामी समर्थ को. ऑप. हौसिंग सोसायटी, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.) जि. ठाणे यांचे कडुन खाली वर्णन केलेल्या मिळकत माझे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी सुध्दा त्यांच्याबरोबर केली आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, नगरपालिका हद्दितील सिटी सर्व्हे नं. ११७२, ११७२/१, ११७२/२, ११७२/३, ११७२/३ए. ११७२/३बी, हया मिळकतीवर बांधलेल्या नियोजित श्री. शिवशक्ती को. ऑप. हौ. सोसायटी, तळमजल्यावरील वाणिज्य गाळा क्र. ४, ज्याचा अलिबाग नगरपालिका दप्तरी जुना मालमत्ता क्र. ALB000002344, नवीन मालमत्ता क्र.Z2RNL002362(1949 अ/१) क्षेत्र २१५ चौ. फुट (१४.५०) बिल्टअप

तरी वरील जमिन मिळकतींबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सात दिवसाच्या मध्ये दाखल कराव्यांत, सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजुन इतर कोणाचाही कायदेशिर हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहेत, असे समजून व कायदेशिर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी. तसेच सदरहु क्षेत्राबाबत हरकत असल्यास तसा दस्त हरकतीसोबत पाठविण्यात यावा.

अलिबाग
दिनांक २५/०७/२०२५

**ॲड. निकिता निकेत बाणे**
पत्ता : गोंधळपाडा, पो. वेश्वी,
ता. अलिबाग जि. रायगड
मो. नं. ८०९७८२५४३५

नि.०७/ड

### जाहीर नोटीस

अर्जदारांचे वकील
ॲड. एम.जे. तांबडकर

मुरुड येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर सो., यांचे न्यायालयांत
दि. चौकशी अर्ज क्र. २०/२०२५

प्रज्ञा प्रकाश सदरे, वगैरे-२ ... अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ... सामनेवाला

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, कै. प्रकाश विठ्ठल सदरे हे ता. ०४/१२/२०२४ रोजी मयत झाले असून मयताचे नांवे होंडा कार्स इंडीया लि., या कंपनीची BR V15VX MTIDTEC हे मॉडेल रजिस्ट्रेशन नं. MH-06BM 6550 या क्रमांकाच्या आर.सी.बुकवर तसेच हीरो कंपनीची HERO PASSION X PRO DRUM SELF हे मॉडेल रजिस्ट्रेशन नं. MH-06BK5030 या क्रमांकाचे दोन वाहने आर.सी. बुक सदरी दाखल आहेत. सदरील वर्णनाच्या दोन्हीं वाहनांकरीता असलेल्या आर. टी. ओ. कार्यालयाकडील आर.सी.बुक करीता अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत हे ठरवून मिळण्याकरीता मुरुड येथील मे. न्यायालयामध्ये अर्जदार यांचे नावे कै. प्रकाश विठ्ठल सदरे यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला/ हेअरशिप सर्टिफिकेट करीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

तरी असा दाखला देणेंस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी तारीख २५/०८/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी कार्यालयीन वेळेत मे. कोर्टात हजर राहून आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास याकामी योग्य तो हुकूम करण्यांत येईल व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आल्यास तिची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २२ माहे जुलै सन २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहाय्यक अधिक्षक |
| दिवाणी न्यायालय मुरुड | | दिवाणी न्यायायल मुरुड, |

ॲड. एस. वाय. बारटके
अर्जदाराचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.जिल्हा व सत्र न्यायाधिश रायगड सो. यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.३१/२०२५

०१) श्रीमती हेमांगी गिरीधर घरत
०२) वैष्णवी गिरीधर घरत
०३) श्रीयान गिरीधर घरत
सर्व मु. फ्लॅट नं. ९१, नववा मजला,
सी विंग, बिल्डींग नं. १, कल्पतरू रिव्हर साईड, — अर्जदार
पंचमुखी मारुती मंदीरा जवळ, तक्का,
ता.पनवेल, जि. रायगड-४१०२०६
अर्जदार क. १ स्वत: करीता व अर्जदार
क्र.२ व ३ यांची अज्ञान पालनकर्ती म्हणून
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर संमन्स/नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. गिरीधर रमाकांत घरत हे दिनांक ०५.०१.२०२१ रोजी मयत झाले आहेत. कै. गिरीधर रमाकांत घरत यांचे मालकीची मौजे उलवे, भुखंड क्र. १७३, सेक्टर क्र. १७, क्षेत्र १०४९.९१ चौरस मिटर या क्षेत्राचे मिळकती संदर्भात अर्जदार यांनी दि गार्डीयन्स ॲन्ड वॉर्डस ॲक्ट, १८९० चे कलम ७ व २९ प्रमाणे अर्जदार क्र. २ व ३ यांची अज्ञान पालनकर्ती म्हणून नेमणूक करून मिळणे करीता व संदर्भित मिळकत अर्जदार क्र. २ व ३ यांचे वतीने विक्री करणेची परवानगी मिळणे करीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब, अर्जदार क्र. २ व ३ यांची अर्जदार क्र. १ हि अज्ञान पालन कर्ती व त्यांचे वतीने संदर्भित मिळकत विक्री करण्यास परवानगी देणेस कोणाचीही हरकत असल्यास आपण स्वत: अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचेमार्फत या मा.जिल्हा न्यायाधिश, रायगड अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक ११-०९-२०२५ रोजी हजर रहावे. हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३-०७-२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- | | सही/- |
|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक | कोर्टाचा शिक्का | सहा.अधिक्षक |
| जिल्हा न्यायाधीश रायगड | | जिल्हा न्यायाधीश रायगड |
| पनवेल-रायगड | | पनवेल-रायगड |

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक **नियाझ अहमद नझीर अहमद कुरेशी** यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८१ | १३ | ०-०६-१० | ०-८३ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २५/०७/२०२५

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड मो.नं ९१५८३१३७३३

### नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येत की आमचे अशिल श्री. संतोष प्रभाकर पाटील, रा. तांबाटी, ता. खालापूर, जि. रायगड यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. दिनेश भरत दिवाडकर, रा. उल्वे, वहाळ, नवी मुंबई यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-नवघर,तालुका-सुधागड, जिल्हा-रायगड**

| गट नंबर | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २८० | एकूण क्षेत्र २-८३-००, यापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र ००-८०-०० पैकी ००-२०-०० हे. आर. प्रति विक्री क्षेत्र | १ रु ४२ |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची व ताबे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत,लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिदध झालेपासून ७ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २५/०७/२०२५

सही/-
**ॲड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी) मुंबई हायकोर्ट
ऑफीस पत्ता- नारायण देशमुख
हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत-रायगड मो.न.९८८११३२२४८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत तिचे मालक भाग्यश्री परेश ठाकूर व सुरेंद्र प्रभाकर कोतवाल यांचेकडून त्यांचे स्वतंत्र हिश्याच्या क्षेत्रफळाची जमिन मिळकत कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५९ | २/अ/१ | ०-२५-०० | ३.२५ |

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, लिज, विक्रीचा करार, चार्ज, बक्षीस, वहिवाट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास वर वर्णन करण्यात आलेली मिळकत ही निर्वेध, बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि. २५/०७/२०२७
मो.९८५०८९९२२९

**ॲड. सुवर्णा लक्ष्मीकांत चंदन**
शिव ओम कॉम्प्लेक्स, मुद्दे(बु.)
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे हालिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४/२/१, ४/२/२, ४/२/३, ४/३, ५/२, ५/४, ५/६, ५/५/अ/१, ५/५/अ/२, ५/५/अ/३, ५/५/अ/४ यावरील सिग्नेचर डिझायर या इमारतीमधील एल विंग, सदनिका नं. २०२, दुसरा मजला, क्षेत्र २७.५ चौ. मी कारपेट
(Block Number : FLAT No. 202)

सदर मिळकतीबाबत कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, बक्षीस, लिज, लिन, वारस हक्क, पोटगी, ताबा, वहिवाट, हवाला, मृत्युपत्र, साठेकरार, खरेदीखत, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ८ (आठ) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

ठिकाण :- कर्जत
तारीख :- २४ एप्रिल २०२५.

सही/-
**ॲड. तारा रमेश देशमुख**
रा. धापया मंदिर रोड कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड.
मोबा. ९३७२४२७८९०.
७२७६६०२३२५.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, खाली वर्णन केलेली बिनशेती मिळकत आमचे अशिल श्री. कैलाश प्रल्हाद डाळींबकर आणि श्री. कपिल कैलाश डाळींबकर रा. श्रमसाफल्य ००२, कलावती मंदिर जवळ, कोतवाल नगर, कर्जत, जि. रायगड ४१०२०१ यांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे.

**मौजे मोठे वेणगाव ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१**

| जमिन मालक | सर्वे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हेक्टर आर चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. नितीन शांताराम सोरखादे, श्री. रविंद्र शांताराम सोरखादे, श्री. दत्ताराम शांताराम सोरखादे | ६ | १/२३ | ४.४०.०० | ४४.०० |

तरी वरील मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा- कब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी, हक्क मृत्युपत्रांकीत दान, गहान, बक्षिस, फरोक्त लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत कळविणेस आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

तारीख : २३/०७/२०२५

**ॲड. चंदा सुधाकर खापने**
पत्ता-ज्ञानदिप सोसायटी, कर्जत-नेरळ रोड,
किरवली, ता. कर्जत, जि. रायगड
मोबाइल नंबर - ९८१९४२१८६८

### तहसील कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र.४३०/२०२५

श्री.दिलीप काशिनाथ ठोंबरे — वादी
रा.कोशाणी ता. कर्जत, जि. रायगड
ग्रामपंचायत अधिकारी-हातोंड — प्रतिवादी
ता.सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे जन्म-मृत्यूबाबत**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री.दिलीप काशिनाथ ठोंबरे, रा. कोशाणी, ता. कर्जत, जि. रायगड यांनी माझी भाची कु. सुलभा जनार्दन पाटील हिची जन्म दि.०१-११-१९७६ रोजी मौजे गोंदाव ता.सुधागड,जि.रायगड येथे झाला आहे. परंतु तिची नोंद अद्यापपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन तिची जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसील कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर कु. सुलभा जनार्दन पाटील तिच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसील कार्यालय, सुधागड पाली येथे स्वत: अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड
दिनांक :- २३-०७-२०२५

सही/-
**(उत्तम कुंभार)**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी सुधागड**

### बेरोजगार युवक/युवति/महिला/कारागिरांकरिता स्वयम रोजगाराची सुवर्ण संधी

Khadi India

खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा मूळ उद्देश रोजगार देणे, विक्रीसाठी वस्तूंचे उत्पादन आणि जनते मध्ये आत्मनिर्भरता तसेच सुदृढ ग्राम स्वराज्याची भावना निर्माण करणे हा आहे. राज्य कार्यालय, खादी आणि ग्रामोद्योग आयोग, मुंबई यांच्या वतीने ग्रामोद्योग विकास योजनेअंतर्गत १८ ते ५५ वर्षे वयोगटातील बेरोजगार युवक/युवती/महिला/विविध क्षेत्रामध्ये काम करीत असणाऱ्या कारागिरांकडून खालील तक्त्यानुसार विविध कार्यक्रम/उद्योगांअंतर्गत अर्ज मागविले जात आहेत.

| अ. क्र. | कार्यक्रम/उद्योगाचे नाव | कार्यक्षेत्राच्या अंतर्गत दिले जाणारे प्रशिक्षण तसेच वितरित केले जाणाऱ्या टूलकिट/यंत्रांचे विवरण वर्ष २०२५-२६ साठी |
|---|---|---|
| १ | एम बी आय | विद्युतचलित कुंभार चाक |
| २ | सेवा क्षेत्र | इलेक्ट्रिशियन/प्लंबर/शिलाई मशीन/मोबाईल दुरुस्ती |
| ३ | ए बी एफ पी आय | फ्रूट अँड व्हेजिटेबल/व्हिलेज ऑइल/ताड गुळ |
| ४ | रेन्टी | वेस्ट वुडच्या अंतर्गत |
| ५ | हनी मिशन | मधमाशी पालन |
| ६ | एच एम पी एफ आय | पेपर/द्रोण पत्रावळी मशीन |
| ७ | पी सी बी आय/ डब्ल्यू सी आय | ऑटोमॅटिक अगरबत्ती मशीन |
| ८ | पी सी बी आय | लेदर/फुटवेअर मशीन व टूलकिट |

टीप : १) सदर योजने अंतर्गत सामान्य / ओबीसी प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या २० टक्के, अजा/अज लाभार्थ्यांसाठी मशीन किंमतीच्या १० टक्के आणि बीपीएल धारकांना शून्य टक्के लाभार्थी हिस्सा (own contribution) कार्यालयामध्ये जमा करावे लागतील. २) प्रथम प्राप्त अर्जांना प्राधान्य दिले जाईल. ३) लाभार्थ्यांची निवड राज्यस्तरीय समितीद्वारे केली जाईल, समितीचा निर्णय अंतिम तसेच बंधनकारक असेल. आपले अर्ज खालील दिलेल्या पत्त्यावर व ई-मेल वर पाठवावे.

– संचालक

**खादी आणि ग्रामोद्योग आयोग**
(सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार)
नॅशनल इंशुरंस बिल्डिंग, ४था मजला, १४ जे.टी. रोड, चर्चगेट, मुंबई – ४०० ०२०
टेलि/फेक्स: +९१ २२ २२८१७४४९ ई-मेल: somkvicbom@yahoo.com

# बीसीसीआय येणार सरकारच्या अखत्यारीत

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारतीय क्रिकेट बोर्ड आता लवकरच राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरण प्रशासनातंर्गत येणार आहे. लोकसभेत बुधवारी (दि.२३) राष्ट्रीय क्रीडा प्रशासकीय विधेयक सादर करण्यात आले. बीसीसीआयला सरकार आर्थिक मदत देणार नाही. परंतु, त्याला सर्व प्रकारच्या नियुक्त्यांसाठी आणि इतर निर्णयापूर्वी राष्ट्रीय क्रीडा मंडळाची मान्यता घ्यावी लागणार आहे. क्रीडा प्रशासन विधेयकाचा उद्देश हा वेळेवर निवडणुका घेणे, प्रशासकीय जबाबदारी निश्चित करणे, खेळाडूंना सोयी-सुविधांसह त्यांच्या कल्याणासाठी एक मजबूत शिखर संघटना तयार करणे हा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बीसीसीआय आता सरकारच्या अखत्यारीत येणार आहे. राष्ट्रीय क्रीडा प्रशासकीय विधेयक मंजूर झाल्यानंतर भारतीय क्रिकेट बोर्ड त्यांतर्गत काम करणार आहे. त्यामुळे बीसीसीआयला त्यातंर्गत काम करावे लागेल. तसेच, नियमांचे पालन करावे लागेल. सध्या बीसीसीआय क्रीडा मंत्रालयाकडून कोणतीही मदत घेत नाही. परंतु, संसदेचे नियम बीसीसीआयला बंधनकारक आहेत.

अर्थात राष्ट्रीय क्रीडा प्रशासकीय विधेयकातंर्गत बीसीसीआय येणार असली तरी ती एक स्वायत्त संस्था असेल. परंतु, वाद वा इतर महत्त्वाच्या मुद्दावर मात्र तिला राष्ट्रीय क्रीडा बोर्डाशी चर्चा करावी लागेल. त्यांच्या निर्देशांचे पालन करावे लागेल. बीसीसीआयवरील नियुक्तांसंबंधी राष्ट्रीय क्रीडा मंडळाशी चर्चा करावी लागेल. त्यांच्या सल्ल्यानुसार काम करावे लागेल. सरकार प्रत्येक गोष्टीत थेट हस्तक्षेप करणार नाही. तर, सर्व राष्ट्रीय क्रीडा संस्था एका छताखाली आणून त्यांच्यात सुशासन आणणे हा या विधेयकाचा, बिलाचा उद्देश असल्याची माहिती मिळत आहे.



### सादर होणाऱ्या बिलावर लक्ष

**टी-२० क्रिकेट येत्या २०२८ मधील ऑलम्पिकमध्ये खेळण्यात येणार आहे. लॉस एंजिल्समध्ये ऑलम्पिक होईल. त्यात अनेक देशांचे क्रिकेट संघ खेळणार असल्याची माहिती समोर येत आहे. बीसीसीआय यापूर्वीच ऑलम्पिकचा भाग झाली आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत शक्य यांनी याविषयीची माहिती दिली आहे. त्यानुसार, बीसीसीआय संसदेत सादर होणाऱ्या बिलावर लक्ष ठेवून आहे. त्यावर सरकार काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यानंतर याविषयी पुढील पाऊल टाकण्यात येईल, असे ते म्हणाले.**

### उपाध्यक्षांची सावध भूमिका

**केंद्र सरकारने संसदेत सादर केलेल्या राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयकाबाबत बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सावध भूमिका घेतली आहे. विधेयकावर कोणतीही स्पष्ट भूमिका न मांडता आधी त्या विधेयकाचा सखोल अभ्यास करू आणि त्यानंतर आपले मत व्यक्त करू, अशी टाळाटाळ करणारी भूमिका समोर येत आहे. राजीव शुक्ला यांनी बोलताना सांगितले की, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक संसदेत सादर झाले आहे. त्याचा सविस्तर अभ्यास केल्याशिवाय आम्ही कोणतीही भूमिका मांडू शकत नाही. आधी आम्ही हे विधेयक नीट समजून घेऊ, त्यानंतरच आपली अधिकृत भूमिका तुमच्यासमोर मांडू. या विधेयकात देशातील सर्व क्रीडा संघटनांमध्ये पारदर्शकता, जबाबदारी आणि सुशासन सुनिश्चित करण्यासाठी विविध तरतुदी सुचवण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले.**

# बॅडमिंटनपटूंचा अखेर पदक देऊन सन्मान



**■ भारतीय विद्यापीठ संघटनेकडून बलजीत सिंग सेखो यांचे निलंबन**

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

व्यवस्थापनेच्या चुकीमुळे जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेतील पदक हुकलेल्या भारताच्या सहा बॅडमिंटनपटूंचा अखेर पदक देऊन सन्मान करण्यात येणार आहे. याचसोबत या प्रकरणाबाबत भारतीय विद्यापीठ संघटनेकडून कठोर पाऊल उचलण्यात आले असून, याअंतर्गत सरचिटणीस बलजीत सिंग सेखो यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, गैरव्यवस्थापन प्रकरणाबाबत चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापनाही याप्रसंगी करण्यात आली आहे.

भारताच्या बॅडमिंटन संघाने जागतिक क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. भारताच्या या संघामध्ये १२ खेळाडूंचा समावेश होता. त्यापैकी व्यवस्थापनाच्या चुकीमुळे सहा खेळाडूंना बाहेर ठेवण्यात आले. काही खेळाडूंची नावे व्यवस्थितरित्या लिहण्यात आली नाहीत. १६ जुलै रोजी झालेल्या व्यवस्थापकांच्या बैठकीत ही चूक झाली. भारतीय विद्यापीठ संघटना व जागतिक विद्यापीठ क्रीडा संघटना यांच्यामध्ये चर्चा व संवाद झाला. त्यानंतर भारतीय संघात निवड झालेल्या सर्व अर्थातच १२ खेळाडूंना पदके व प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला. रोहनकुमार, दर्शन पुजारी, अदिती भट, अभिनाश मोहंती, विराज कुवळे, अलिशा खान यांचा भारतीय संघात समावेश होता, पण त्यांना खेळण्याची संधी मिळाली नाही. दरम्यान, महिला खेळाडू देवयानी बाझला हिनेही पदाधिकाऱ्यांच्या चुकीमुळे मला क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी होता आले नाही, असा आरोप केला आहे.

# जिल्ह्यातील खेळाडूंना मिळणार ओळखपत्र

| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असो. च्यावतीने जिल्ह्यातील सर्व वयोगटातील व खुल्या गटातील सर्व खेळाडूंच्या नोंदणी कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व खेळाडूंची नोंदणी करून त्यांना कायम स्वरुपी ओळखपत्र देण्यात येणार आहे. या ओळखपत्रावर प्रत्येक खेळाडूच्या संपूर्ण माहितीसह खेळाडूचा कायम स्वरूपी नोंदणी क्रमांक असणार आहे. प्रत्येक खेळाडूला आपली नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणी केलेल्याच खेळाडूंना रायगड जिल्हा क्रिकेट असो. व सर्व मान्यता प्राप्त स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. या संदर्भात रायगड जिल्हा क्रिकेट असो.च्यावतीने जिल्ह्यातील सर्व क्रिकेट क्लब, अकॅडमी व क्रिकेट संघांच्या प्रतिनिधींसाठी संवाद शिबिराचे आयोजन करून त्यांना खेळाडूंच्या नोंदणी विषयी संपूर्ण माहिती देण्यात आली. जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदिप नाईक यांच्यावतीने नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

RAIGAD DISTRICT CRICKET ASSOCIATION

# आशिया चषकाला हिरवा कंदील

## भारत, पाकिस्तान यांच्यात लढत होणार

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

भारत आणि पाकिस्तान यांच्यातले ताणलेले संबंध पाहता, उभय देशांमधील क्रिकेट सामन्यांना विरोध होत आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीयांनी पाकिस्तानविरुद्ध क्रिकेट खेळण्याची काहीच गरज नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळेच मागील आठवड्यात डब्लूसीएलमधील सामन्यातून भारतीय खेळाडूंनी माघार घेतली आणि मॅच रद्द करावी लागली. त्यामुळेच आशिया चषक स्पर्धेवरही अनिश्चिततेचे सावट होते. परंतु, आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळान एक पाऊल मागे घेतल्याचे दिसत आहे.

आशियाई क्रिकेट परिषदेने आशिया चषक स्पर्धेच्या नियोजनाच्या दृष्टीने ढाका येथे २४-२५ जुलैला बैठकीचे आयोजन केले आहे. ही बैठक ढाका येथे घेता कामा नये, यासाठी बीसीसीआयने तीव्र विरोध केला होता. त्यांना श्रीलंका व अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डांचाही पाठिंबा मिळाला होता. तरीही पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे व एसीसीचे प्रमुख मोहसिन नक्वी बुधवारी बांगलादेशला पोहोचले. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला या बैठकीला व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजेरी लावणार असल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, आशिया चषक स्पर्धा ८ ते २८ सप्टेंबर या कालवाधीत दुबई किंवा अबु धाबी येथे खेळवली जाण्याची शक्यता आहे. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका आणि अफगाणिस्तान या एसीसीच्या पूर्ण सदस्यांसह प्रीमिअर चषक स्पर्धेतील विजेते ओमान, युएई आणि हाँग काँग असे एकूण ८ संघांमध्ये ही स्पर्धा खेळवली जाणार आहे.




### मनसुख मांडविया यांचे स्पष्टीकरण

**काही दिवसंपूर्वी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी भारत विरूद्ध पाकिस्तान क्रिकेट सामन्याला हरकत नसल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे या स्पर्धेला हिरवा झेंडा मिळालाच होता. ही स्पर्धा न झाल्यास पीसीबीला मोठा आर्थिक फटका बसणार आहे.**

# मराठमोळ्या दिव्याचा जगात डंका

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राची १९ वर्षीय युवा खेळाडू दिव्या देशमुख हिने बुद्धीबळाच्या पटावर दबावाखाली आपला खेळ उंचावला आणि महिला बुद्धीबळ विश्वकरंडकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तिने १०१ चालींनंतर चीनच्या टॅन झोनग्यी हिच्यावर १.५-०.५ अशा फरकाने मात करताना उल्लेखनीय खेळ केला आहे. प्रतिष्ठेच्या क्रीडा स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी दिव्या ही भारताची महिला खेळाडू ठरली. दिव्याच्या दमदार कामगिरीचे देशभरातून कौतुक होत आहे.



दिव्या देशमुख-टॅन झोनग्यी यांच्यामधील लढतीमध्ये सुरुवातीपासूनच चढ उतार दिसून आला. सुरुवातीला दिव्याकडून प्रतिमेला साजेशा खेळ झाला नाही. त्यामुळे पहिल्या १८ चालींनंतर ती पराभूत होईल असे वाटू लागली. मात्र, ३२ ते ३६ चालींमध्ये तिने झोकात पुनरागमन केले आणि विजयाच्या दिशेने पाऊल टाकले. काही कालावधीनंतर दिव्याने हातामध्ये आलेली सुवर्णसंधी गमावली. दिव्या देशमुख व टॅन झोनग्यी या दोन्ही खेळाडूंकडून चुकांवर चुका होऊ लागल्या. अशा परिस्थितीत दोघींकडेही विजयाची संधी निर्माण झाली. मात्र, दिव्या हिने दबावाखाली न बिथरता छान खेळ केला. अखेर तिने १०१ चालींनंतर विजयाला गवसणी घातली. त्यामुळे दिव्या देशमुख हिने विश्वकरंडकाच्या अंतिम फेरीत प्रवेश करुन इतिहास रचला आहे. त्याचसोबत तिने २०२६मध्ये होणार असलेल्या कँडीडेट स्पर्धेची पात्रताही मिळवली आहे.

### हंपीची लढत पुन्हा ड्रॉ

**भारताची कोनेरू हंपी व चीनची लेई टिंगझी यांच्यामध्ये अन्य उपांत्य फेरीची लढत रंगली. उपांत्य फेरीचा पहिला टप्पा ड्रॉ राहिला होता. त्यामुळे दुसऱ्या टप्प्याकडे लक्ष लागून राहिले होते. मात्र, या दोन खेळाडूंमधील दुसरा टप्पाही ड्रॉ राहिला. त्यामुळे दोन्ही खेळाडूंना १-१ अशा बरोबरीत समाधान मानावे लागले.**

# बॅडमिंटनपटू सिंधूची आगेकूच




| चँगझोऊ | वृत्तसंस्था |

भारताची अनुभवी महिला बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू हिने जागतिक क्रमवारीत सहाव्या स्थानावर असलेल्या टोमोका मियाझाकी हिच्यावर तीन डावात रोमहर्षक विजय मिळवला. आता पुढल्या फेरीत तिच्यासमोर भारताच्याच उन्नती हुडा हिचे आव्हान असणार आहे. सिंधूने पहिला डाव २१-१५ असा आपल्या नावावर केला. दुसऱ्या डावता मियाझाकी हिने २१-८ अशी बाजी मारली. अखेरच्या डावात सिंधू हिने २१-१७ असे यश संपादन करीत आगेकूच केली.

# आयुष म्हात्रेचे विक्रमी कामगिरी



| लंडन | वृत्तसंस्था |

भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा कर्णधार आयुष म्हात्रे याने इंग्लंड दौऱ्यावर विक्रमी कामगिरी केली. त्याने १९ वर्षांखालील कसोटी क्रिकेटमधील सर्वात वेगवान शतक झळकावले. इंग्लंडच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीत आयुषने दुसऱ्या डावात ६४ चेंडूंत शतक झळकावले आहे. इंग्लंडने ठेवलेल्या ३५५ धावांचा पाठलाग करताना भारताचा सलामीवीर वैभव सूर्यवंशी हा गोल्डन डकवर बाद झाला. मात्र, आयुष मैदानावर उभा राहिला. त्याने ८० चेंडूंत १२६ धावा चोपल्या. त्याने संघाला विजय मिळवून देण्यासाठी पूर्ण जोर लावला. अवघ्या २५ चेंडूंत त्याने अर्धशतक पूर्ण केले. २७ व्या षटकात त्याने शतक पूर्ण केले आणि यापूर्वी इंग्लंडच्या जॉर्ज बेलच्या नावावर असलेल्या २०२२ सालचा विक्रम मोडला. बेलने २०२२ मध्ये श्रीलंकेच्या १९ वर्षांखालील संघाविरुद्ध ८८ चेंडूंत शतक पूर्ण केले होते. युवा कसोटीत वेगवान शतकाच्या यादीत तिसऱ्या क्रमांकही आयुषचाच आहे. त्याने पहिल्या कसोटीत १०७ चेंडूंत शतक झळकावले होते.

**रिषभ पंतला गंभीर दुखापत** | **दिवसाअखेर ४ गडी गमावत २४८ धावा**

# भारताचे पहिल्या दिवसावर वर्चस्व

| मँचेस्टर | वृत्तसंस्था |

भारत आणि इंग्लंड यांच्यात मँचेस्टर येथे पार पडत असलेल्या चौथा कसोटी सामना सुरु आहे. पहिल्या दिवशी भारताने सामन्यावर पकड मिळवल्याचे दिसून आले आहे. भारताने पहिल्या दिवसाखेर ४ गडी गमवून २४८ धावा केल्या. मात्र, ऋषभ पंतच्या दुखापतीमुळे भारतीय संघाची चिंता अधिक वाढली आहे.

तेंडुलकर-अँडरसन कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्यात इंग्लंडने भारताला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले. यावेळी भारताने पहिल्या दिवशी सावध खेळी केली. त्यामुळे पहिल्या दिवसावर भारताची मजबूत पकड दिसून आली. भारताकडून यशस्वी जयस्वाल आणि केएल राहुल यांनी चांगली सुरुवात करून दिली. परंतु, केएल राहुल ४६ धावांवर बाद झाला. त्यानंतर यशस्वी जयस्वालने ५८ धावा केल्या. तर, साई सुदर्शनने चमकदार कामगिरी करत ६१ धावा केल्या. कर्णधार शुबमन गिलची पहिल्या डावात बॅट काही चालली नाही. अवघ्या १२ धावांवर असताना पायचीत झाला. त्यानंतर उपकर्णधार ऋषभ पंतने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने ४८ चेंडूत ३७ धावांची खेळी केली. परंतु, भारतीय डावाच्या ६८ व्या षटकात ख्रिस वोक्सच्या एका वेगवान यॉर्कर चेंडूने पंतला दुखापतग्रस्त केले. हा चेंडू थेट त्याच्या बुटावर लागला. त्याच्या पायातून रक्तस्त्राव होत होता. दुखापतीची तीव्रता आणि वेदना पाहता त्याला ग्राउंड एम्ब्युलन्समध्ये मैदानाबाहेर नेण्यात आले. तो ३७ धावांवर असताना रिटायर्ड हर्ट झाला. भारताचा पहिल्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा ४ गडी गमवून २६४ धावा केल्या आहेत. खराब प्रकाशमानामुळे पहिल्या दिवशीचा खेळ ८३ षटकांचा झाला.




### पंतला विश्रांतीचा सल्ला

**कसोटीच्या पहिल्या दिवशी दुखापत झाल्यामुळे रिटायर्ड हर्ट झालेल्या भारताचा यष्टीरक्षक रिषभ पंतला मोठा धक्का बसला आहे. पंतच्या पायाला फ्रॅक्चर झाल्यामुळे त्याला सहा आठवड्यांचा विश्रांतीचा सल्ला देण्यात आला आहे आणि त्यामुळे त्याला चौथ्या कसोटीत खेळता येणार नाही. तरीही त्याला इंजेक्शन देऊन फलंदाजीसाठी तयार करता येईल का, अशी विचारणा बीसीसीआयने वैद्यकीय टीमकडे केली आहे. अन्यथा भारताला १० फलंदाजांसह मँचेस्टर कसोटीत इंग्लंडचा सामना करावा लागणार आहे. दरम्यान, निवड समितीने इशान किशनला पाचव्या कसोटीसाठी स्टँडबायवर राहण्यास सांगितले आहे. पंत ३१ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान ओव्हल येथे खेळल्या जाणाऱ्या शेवटच्या कसोटी सामन्याचा भाग असणार नाही.**

## निवडक

### पायाला दुखापत असूनही रिषभ पंत मैदानात उतरला



**मँचेस्टर** : भारत आणि इंग्लंड संघात कसोटी मालिकेतील चौथा सामना मँचेस्टरमध्ये बुधवारपासून सुरू आहे. या सामन्यात भारताचा पहिला डाव दुसऱ्या दिवशी संपला. इंग्लंडकडून कर्णधार बेन स्टोक्स पुन्हा एकदा भारताविरुद्ध चमकला असून त्याने ५ बळी घेण्याची कामगिरी केली आहे. तरी त्याच्या गोलंदाजीसोबतच दुसऱ्या दिवशी चर्चेचा विषय ठरला ते म्हणजे रिषभ पंतची फलंदाजी. पायाला फ्रॅक्चर असतानाही तो फलंदाजीसाठी उतरला आणि त्याने अर्धशतकही पूर्ण केले. दरम्यान, या सामन्यात दुसऱ्या दिवशी भारताने ८४ व्या षटकापासून आणि ४ बाद २६४ धावांपासून पुढे खेळायला सुरूवात केली होती. दुसऱ्या दिवशी रवींद्र जडेजा (२०) फार काळ टिकू शकला नाही. मात्र, त्यानंतर शार्दुल ठाकूरला वॉशिंग्टन सुंदरने साथ दिली होती. परंतु, १०२ व्या षटकात शार्दुल (४१) बाद झाला. त्यानंतर रिषभ पंत पुन्हा एकदा फलंदाजीला उतरला. तो पहिल्या दिवशी ख्रिस वोक्सचा चेंडू उजव्या तळपायाला लागल्याने ३७ धावांवर रिटायर्ड हर्ट झाला होता. परंतु, संघाची गरज पाहून फ्रॅक्चर असतानाही तो लंगडत मैदानात उतरला. यादरम्यान पंतने या मालिकेतील त्याचे ५ वे अर्धशतक पूर्ण केले. तो वेदना असतानाही खेळत होता. अखेर ५४ धावांची खेळी करून बाद झाला.

### आरसीबी संघावर बंदी येणार?

**नवी दिल्ली** : आरसीबीने अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएलमध्ये विजय मिळवला. त्यानंतर बंगळुरूमध्ये मोठ्या संख्येने चाहत्यांनी आनंद साजरा केला. जो नंतर चेंगराचेंगरीत बदलला. यावेळी सेलिब्रेशनचे योग्य प्रकारे आयोजन केले गेले नव्हते आणि खूप लोक जखमी झाले. दरम्यान, ११ लोकांचा मृत्यू झाला आणि त्यानंतर संघासाठी अडचणी वाढल्या. आता कर्नाटक सरकारने आरसीबीच्या विरोधात कठोर निर्णय दिला आहे. जस्टिन जॉन मायकेल डी' कुन्हा न्याय आयोगाने बंगळुरू चेंगराचेंगरी प्रकरणाची चौकशी केली होती. या चौकशीदरम्यान त्यांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन, एंटरटेनमेंट आणि बंगळुरू पोलीस अधिकाऱ्यांना दोषी ठरवले होते. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांना दिलेल्या रिपोर्टमध्ये, गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती. त्याअंतरीतही सेलिब्रेशन करण्यात आले आणि मोठा अपघात घडला. ही चूक रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशन, एंटरटेनमेंट आणि बंगळुरु पोलिस अधिकाऱ्यांच्या मोठ्या दुर्लक्षाने झाली असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे आसीबीसाठी गोष्टी काळानुसार आणखी कठीण होत चालल्या आहेत. त्यांना स्पष्टपणे दोषी ठरवण्यात आले आहे आणि आता कर्नाटक सरकारच्या निर्णयानंतर बीसीसीआयवरही लक्ष असेल. या दुर्लक्षितपणासाठी आरसीबीवरही कारवाई होऊ शकते. तसेच, संभावना आहे की, क्रिकेट कौन्सिलकडून त्यांना एका हंगामासाठी बंदी घालण्यात येईल. हा निर्णय विराट कोहली आणि बंगळुरुच्या चाहत्यांसाठी फारच वाईट ठरू शकतो.

### फारूक इंजिनीयर यांच्या नावे इंग्लंडमध्ये स्टँड




**मँचेस्टर** : ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना खेळवला जात आहे. या साशन्यापूर्वी भारत आणि वेस्ट इंडिजच्या खेळाडूंचे नाव या स्टेडियममधील स्टॅन्डला देण्यात आले. यादरम्यान भारतीय माजी खेळाडूने आपले दु:ख व्यक्त केले. मँचेस्टरच्या ओल्ड ट्रॅफर्ड स्टेडियममधील एका स्टँडला माजी भारतीय यष्टिरक्षक फारुख इंजिनिअर यांचे नाव देण्यात आले. २३ जुलै रोजी भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी त्यांना हा सन्मान देण्यात आला. फारुख इंजिनिअर हे दुसरे भारतीय क्रिकेटपटू आहेत ज्यांच्या नावावर विदेशी मैदानावर स्टँडचे नाव देण्यात आले आहे. फारूक इंजिनीयर आणि क्लाईव्ह लॉयड यांच्या नावे या स्टेडियममधील स्टॅन्डला नाव देण्यामागचे कारणही खास आहे. दोघेही अनेक वर्षे लँकेशायर क्रिकेट क्लबकडून क्रिकेट खेळले आहेत. ओल्ड ट्रॅफर्ड हे लँकेशायरचे होम ग्राउंड आहे.

### अभिमन्यू ईश्वरन अद्याप बाकावर

**नवी दिल्ली** : करुण नायरच्या सातत्यपूर्ण अपयशानंतर चौथ्या कसोटी सामन्यात त्याला प्लेइंग इलेव्हनमधून वगळण्यात आले. यानंतर सर्वांना अपेक्षा होती की, करुण जर बाकावर बसला, तर अभिमन्यू ईश्वरनची गेल्या अनेक वर्षांपासूनची कसोटी पदार्पणाची प्रतीक्षा संपुष्टात येईल. परंतु, कर्णधार शुबमन गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी वेगळाच निर्णय घेत सर्वांना चकित केले. ओल्ड ट्रॅफर्डच्या मैदानावर साई सुदर्शनला पुन्हा एकदा संधी देण्यात आली, आणि अभिमन्यू बाकावरच बसून राहिला. अभिमन्यु २०२१-२२ पासून भारतीय कसोटी संघासोबत आहे, पण भारतीय संघाची जर्सी घालून मैदानावर उतरण्याचे त्याचे स्वप्न अद्याप पूर्ण झालेले नाही. अभिमन्यू ईश्वरन गेल्या सुमारे चार वर्षांपासून संघात येत आहे आणि पाणी पुरवण्याचे काम करत आहे. ड्रेसिंग रूममध्ये अभिमन्युने खूप वेळ घालवला आहे, पण भारतीय संघाच्या जर्सीत खेळण्याचे स्वप्न केवळ स्वप्नच राहिले आहे. अभिमन्यू भारतीय संघात आल्यानंतर १५ खेळाडूंनी कसोटी पदार्पण केले आहे, ज्यात सूर्यकुमार यादव, रजत पाटीदार, इशान किशन यांसारख्या युवा फलंदाजांचा समावेश आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)